TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY

OU_192445

UNIVERSAL LIBRARY

# शुभं भवतु !

★

: लेखक :

कॅप्टन मा. कृ. शिंदे

रामकृष्ण बुकडेपो, गिरगांव, मुंबई ४

ह्या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे वगैरे सर्व हक्क
सौ. बच्चुबाई भा. शिंदे, शेल्टर, खोताची वाडी,
मुंबई नं. ४, यांचेकडे आहेत.

मुद्रक : कृ. ना. सापळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४

::

प्रकाशक : वि. र. बाम,
रामकृष्ण बुकडेपो, प्रार्थना समाज,
गिरगांव, मुंबई नं. ४.

प्रथमावृत्ति : जानेवारी. १९४९
द्वितीयावृत्ति : जून, १९४९

**किंमत दोन रुपये.**

# शुभं भवतु !

[ द्वितीयावृत्ति ]

कला आणि प्रचार यांची सुंदर सांगड घालून विचारप्रक्षोभक परंतु तितक्याच मनोरंजक अशा लघुकथा लिहिण्याची हातोटी साधलेल्या लोकप्रिय लेखकांत कॅ. मा. कृ. शिंदे यांची प्रामुख्याने गणना होते. 'देवपूजा आणि इतर गोष्टी' आणि 'ठिणग्या आणि टिकल्या' हे त्यांचे दोन लघुकथासंग्रह मराठी वाचकांच्या पूर्ण परिचयाचे आहेत.

'शुभं भवतु' हा त्यांचा तिसरा कथासंग्रह. त्यांच्या ज्या वैशिष्ट्यपूर्ण लघुकथांची महाराष्ट्रातील सर्व प्रमुख नियतकालिकांनीं मनःपूर्वक वाखाणणी केली, त्यापैकी कांही पूर्वप्रसिद्ध निवडक लघुकथा ह्या संग्रहात संकलित केलेल्या आहेत. लग्नें, मुंजी, वाढदिवस, भाऊबीज इत्यादि मंगल प्रसंगी भेटीदाखल व बक्षिसादाखल देण्यासाठी हे पुस्तक उपयोगी पडावे ह्या हेतूनेच आम्ही हें पुस्तक प्रसिद्ध केले. आनंदाची गोष्ट ही की, लगेच त्याची द्वितीयावृत्ति प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला ! अवघ्या एकाच महिन्यात ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति संपली, ही एकच गोष्ट 'शुभं भवतु'ची लोकप्रियता नि उपयुक्तता सिद्ध करायला पुरेशी आहे. पहिल्या आवृत्तिप्रमाणेंच ह्या आवृत्तीचेंहि जनतेकडून सहर्ष स्वागत होईल अशी आमची खात्री आहे.

शुभं भवतु !

जून, १९४९ } —**प्रकाशक**

# कॅप्टन मा. कृ. शिंदे–साहित्य.

: नाटकें :

- बंडखोर कुमारी
- गृहलक्ष्मी [ द्वितीयावृत्ति ]
- गुंतागुंत [ द्वितीयावृत्ति ]
- बनावट बायको [ द्वितीयावृत्ति ]
- अर्थाचा अनर्थ
- ४२ चें आंदोलन

: लघुकथासंग्रह :

- देवपूजा आणि इतर गोष्टी
- तीन बोलपट [ प्रौढ सा. प्र. माला ]
- ठिणग्या आणि टिकल्या
- शुभं भवतु [ द्वितीयावृत्ति ]
- गुलाबी गप्पा ( विनोदी गोष्टी )

: काव्य :

- गांधी माहात्म्य [ ओविबद्ध द्वितीयावृत्ति ]
- मोहन माळ

★

शुभं भवतु !

# कॅप्टन शिंदे यांचीं आगामी पुस्तकें.

: लेख :

- झुंबर

: काव्य :

- गुलगुल गाणीं

: शास्त्रीय :

- वैवाहिक विलास
  आणि इच्छित संतति
- सिनेमाशास्त्र
  आणि तंत्र

: इतर :

- अभिनंदन
- संसारी सूचना
- सौभाग्य-संपदा
- आनंदी आनंद

★

शिवाय अनेक नाटकें
आणि विनोदी पुस्तकें.

# शुभं भवतु !

अरण्य म्हटलं म्हणजे आधीं किर्रच !

तशात ती खबदाडी इतकी भयंकर होती कीं, भयंकर गणल्या जाणाऱ्या हिंस्र पशूंनासुद्धां त्या दरींत उतरायला भीतीच वाटली असती !

गगनचुंबि अवाढव्य वृक्षराजीच्या बनदाट विस्ताराने सूर्याचीं सारीं किरणें अडवून धरल्यामुळे त्या खोल दरींत काळोखाशिवाय चिटपाखरूंहि नव्हतें म्हटलें तरी चालेल.

अशा काळोखाच्या काळ्या एकांतांत श्री. खडकोपंत काळाची तपश्चर्या करीत स्वस्थ बसले होते. पण तितक्यांत—

विहिणींच्या कलकलाटाप्रमाणे कसला तरी खळखळाट सुरू झाला. धनुष्यापासून सणसणत सुटलेल्या बाणांप्रमाणें कसला तरी सणसणाट सुटला.

'धिःकार ! पुरुषांचा धिःकार करा ! महिलानो, पुरुषावर बहिष्कार घाला ! !'

हे शब्द खडकोपंताच्या कानीं पडल्यामुळें त्यांनीं आपले खडकी डोळे उघडले आणि ते किलकिल्या डोळ्यांनीं आजूबाजूला पाहूं लागले.

त्याना सरिताबाला दिसली !

ती तर काय ? डंवचलेल्या नागिणीप्रमाणे फणफणत, रांगतच पण जोरजोरानें चालली होती. त्यानी तिला पुरती पाहिलीहि नसेल, तोंच

ती त्यांना तुडवीत निघूनहि गेली. पण खडकोपंतांच्या आसनमांडी घालून बसलेल्या पायाच्या आंगठ्यास तिचा आधुनिक पातळ पातळाचा पायांपर्यंत लोंबणारा पदर अडकल्यामुळें तिला जरा थबकणें भाग पडलें.

खडकोपंतामुळे—एका पुरुषामुळें आपली गति थांबली, हें तिला मुळींच सहन झालें नाहीं. मग काय विचारतां ? आगींत तेल पडल्यासारखें झाले. सरितेनें कडकलक्ष्मीचा असा उग्र अवतार धारण केला कीं, कलकत्याची महाकालिका चंडीच !

सरितेच्या अंगाचा तिळपापड उडालेला असावा हें खडकोपंतानीं लगेच ताडलें; आणि त्यांनीं तिचें समाधान करण्यासाठीं म्हटलें— 'हे निर्झरदुहिते !—'

पुढचें पुरतें एकूनहि न घेता, ती बेफामपणें आणि बेमुर्वतपणे खडकोपंतावर खेकसून म्हणाली, 'खडक्या ! खबरदार त्या निर्झराचें नाव माझ्यापुढं काढशील तर ! तो निर्झर पुरुष, तसा तूंहि पुरुषच आहेस नाहीं का ! काय रे खडक्या, जेव्हां तेव्हा तुम्हीं पुरुष, आम्हा स्त्रियांचा मार्ग कां अडवून बसता ! स्वतःला पाय ताणून सुखाने सुखनिद्रा घेता यावी, म्हणून तुम्ही आमच्या प्रगतीचा ओघ मुद्दाम बंद करता ? बहिष्कार—बहिष्कारच घातला पाहिजे आतां तुमच्यावर ! '

सरितेने एवढेसे प्रकरण स्त्रीपुरुषाच्या वादापर्यंत पोंचविलेले पाहून तिचे कांहींतरी मुळांतच बिनसलेले असावें, हे खडकोपंतांनीं ओळखलें. शिवाय आपल्यासारख्या पुराणपुरुषाला ' अरे तुरे ' म्हटल्याबद्दल त्यांना थोडें वाईटहि वाटलें. परंतु ' निर्झरासारख्या प्रत्यक्ष बापाला बाप न म्हणणारी वेडी पोर, मला खडकाला काका तरी काय म्हणणार ! ' असे मनाचें समाधान करून घेऊन ते पुढे म्हणाले—' हे पहा सरिते, पुरुषमत्सरानें अशी पेटून जाऊं नकोस. काय केले आम्हीं असे स्त्रियांचें अनहित ग ? '

'काय ? लाज नाहीं वाटत उलट विचारायला ? म्हणे काय केलं अनहित–?' वेडावीत व नदींतील गरगर फिरणाऱ्या भोंवऱ्याच्या रूपानें हात ओंवाळींत ती पुढें बोलूं लागली.

'आतांच पहाना ?–मी आपली कशी माझ्या मार्गानं जात होते. मग काहो मला तुम्हीं अडविलंत? तुम्हीं पुरुष, चांगली मोठी मानाची जागा ऐसपैस अडवून मिरासदार होऊन बसता, आणि आम्हा स्त्रियाना त्या बाजूस फिरकायची सुद्धा बंदी ! वाहवा रे तुम्ही पुरुष ! आम्हीं तुमचा आतां धिःकारच करणार ! धिःकार –पुरुषाचा त्रिवार धिःकार ! ! !

'अग पण सरिते, मग तूं मुद्दाम होऊन तुडवून जाऊं लागलीस, तरीसुद्धा मी तुला थांबवूं नको ? आम्ही पुरुष अडवितो एवढीच का ही जागा जागांत आहे ! एवढं थोरलं क्षेत्र आहे ! मी माझ्यानें सोसवेल तेवढी झीज सोसून तुझा मार्ग मोकळा करून दिलाच आहे. कणांकणानीं का होईना, पण पहा बरं, मी तुझ्यामुळें किती झिजतो आहें तो ! हा माझा पुरुषाचा गुण नजरेआड करून उलट पुरुषांवरच ताव झोडतेस ! काय हा तुमचा स्त्रियांचा न्याय ?'

खडकोपंतांनीं सरितेची समजूत करण्याची शिकस्त केली, पण तिचा कांहीं पूर्वग्रह नाहींसा होईना. तिने उलट 'तुम्ही बाहेरून काळे आहात तसेच आंतहि काळे कोळसेच आहात की हो खडकोपंत !' असा मर्मभेदक टोमणा मारायला कमी केले. नाहीं.

हा टोमणा ऐकून मात्र खडकोपंत तुसते भडकोपंत बनले !

खरेंच आहे. कालच्या परकरांतल्या शेंबड्या पोरीनें एकदम पुरुषावर असें तोंडसुख घेतलेले खडकोपंतासारख्या तपोवृद्ध पुरुषास कसें खपावें ! त्यानीं लगेच तिला कानपिचक्या द्यायला सुरवात केली.

'का ग पोरी, जास्तशी मिजास मारतेस ?–अं ? मी बाहेरून काळा तसा आंतहि काळा आहें, याचा अर्थ असा कीं, आम्ही

पुरुष अतर्बाह्य सारखेच असतो. पण तुम्ही स्त्रिया–' वरुनि भोळ्या, आत बगळ्या !' तुझेच रूप पहा ना. तुझं बाह्य रूप पहावं तर गंगोदका-सारखं निर्मळ ! पण अंतर्यामी पहावं तर रबरबीत चिखल–साऱ्या मुलुखाची घाण ! मग आंत बाहेर सारखे असलेले पुरुष भयंकर, कीं 'तुम्ही' आत एक आणि बाहेर दुसरं दाखविण्यांत पटाईत असलेल्या स्त्रिया भयंकर ! धोपट मार्ग हा पुरुषांचा मार्ग ! आमची चाल कशी अगदीं सरळ असते. पण तुमची कधीं सरळ चाल नाहींच. सर्पगतीप्रमाणे हजारो वेडीवाकडीं वळणे घ्याल तेव्हांच चालाल ! तुम्ही स्त्रिया म्हणजे वाकड्याच चालीच्या !'

' महाराज, जास्त दिवे पाजळूं नका बरं तुमच्यासारखे दुष्ट आणि पाषाणहृदयी काळपुरुष ह्या जगांत भरलेले आहेत, म्हणूनच बिचाऱ्या स्त्रियांचे पाऊल वांकडं पडतं, आणि मग त्यांच्या आयुष्यालाहि वाकडच वळण लागतं. पण हें सारं पाप तुम्हां पुरुषाच्याच कपाळावर बसल्या-शिवाय रहाणार नाहीं बरं ?'

असें बराच वेळ चाललें होतें. खडकाने पुरुषाची बाजू घेऊन आणि सरितेनें स्त्रियांची बाजू धरून, दोघानींहि एकमेकांच्या काढतां येतील तेवढ्या उखाळ्या पाखाळ्या काढायला कमी केलें नाहीं. हे प्रकरण हातघाईवर येतें कीं काय, अशी लाब एके बाजूला राहून कान देऊन ऐकत बसलेल्या निर्झरराजास भीति वाटली; आणि तो त्या दोघा स्त्री–पुरुषांच्या लढ्यांत पडण्याचा विचार करूं लागला पण तितक्यातच खडकोपंतांनीं सरितेस हाक मारून हंसत विचारले,—' वेड्या पोरी, तूं मघांपासून पुरुषजातीवर एवढे दातओंठ खातेस, पण तुझा पिता हाहि एक पुरुषच आहे हें तूं विसरलीस वाटतं ! निर्झरराज कोण ? तुला जन्म कोणी दिला ?—'

माझा जन्म ?—माझा जन्म धरणीमातेपासून झाला. धरणीमातेमुळेच

मी जन्माला आलें. समजलं !' सरितेने विचार न करतांच मोठ्या दिमाखानें उत्तर दिलें.

सरितेचे हे असमंजसपणाचें, अविचाराचें आणि पोरकटपणाचें उत्तर ऐकून तिच्या पित्यास—निर्झरराजास गदगदां हंसूं कोसळले.

ते हास्य-तुषार सरितेच्या आणि खडकोपंताच्या कानांत पडले व दोघानींही मागें मुरडून पाहिलें.

परंतु एकदा मोठ्यानें हंसण्यापेक्षा निर्झरराजाने दुसरें कांहींच केलें नाहीं. सरितेच्या हृदयांत मात्र पितृप्रेमाचा पूर आला. आणि त्या प्रेमपुराच्या पवित्र प्रवाहात खडकोपंतानीं बुडी मारली. त्यावेळीं तिथें निर्झर-नदीशिवाय—त्या पितापुत्रींशिवाय दुसरें कोणींच नव्हतें.

'बाळे,—' गंभीर आणि अधिकारी वाणीनें निर्झर सरितेस म्हणाला. 'काय मांडलं आहेस हे तूं आज ? तूं वेडी का आहेस ?'

निर्झरराजाच्या प्रश्नास उत्तर न देता सरिता म्हणाली—'बाबा, मला कोणी जन्म दिला ?—धरणीमातेने कीं तुम्हीं ?' यावेळीं सरितेचे डोळे इतके तुडुंब भरले होते कीं, कांठाच्या पापण्या दुथडी वहात होत्या.

'बाळे, तेच सांगतों. मी आणि तुझ्या धरिणीमातेनं—आम्ही दोघांनींहि तुला जन्म दिला. तुला जन्म देण्यात गुन्हा झाला असेल, तर तो आम्हां दोघांच्या—स्त्रीपुरुषांच्या हातून झाला आहे. यात स्त्री आणि पुरुष सारखीच अपराधी आहेत. परंतु बाळे, मी तुला जन्म दिला असला, तरी तुला तुझ्या आईनें अंगाखांद्यावरून खेळविली आणि ती ज्या दिशेनें तुला नेईल त्याच दिशेनें तूं आता जात आहेस. अर्थात् तुझ्या भावी आयुष्याबद्दल माझ्यापेक्षां तुझी आईच नाहीं का जास्त जबाबदार ठरत ? मग तुमचं हित अहित पुरुषांच्या हातीं असतं, की आईकडून होणाऱ्या संस्कारावर अवलंबून असतं ? पहा, यांत तुला कोणाची चूक दिसते बरं ! मग नुसत्या पुरुषांच्याच नांवाने दगड फोडण्यांत तरी काय अर्थ ?

बरं, तुम्ही स्त्रिया लेच्यापेच्या का आहांत? तुमच्या अंगीं इतकें पाणी आहे की, तुमच्या स्फूर्तीच्या–कर्तृत्वशक्तीच्या ओघाआड येणाऱ्या खडकोपंतासारख्या फत्तराच्याहि काळजाचे पाणीपाणी होऊन जाऊन, प्रसंगीं त्या काळ्या पाषाणासहि तुम्ही जमीनदोस्त करूं शकाल !'

निर्झराचें भाषण ऐकतांना सरितेच्या मनावर कसलेतरी आघात होत होते, तिची मुद्रा क्षणोक्षणीं प्रत्येक शब्दागणिक बदलत होती. तिची चूक तिच्या ध्यानात येत होती. आपल्या भाषणाचा योग्य उपयोग होतो आहे हें निर्झराच्या लक्षांत येऊन त्यानीं पुढें विचारलें,–' बाळे सरिते ! पहा, तूं पुरुषांवर बहिष्कार पुकारूं पहातेस, पण पुढें तुझ्या आयुष्याचा रोख कुठें आहे, याचा तूं कधीं विचार केला आहेस का ? निसर्गनियमांचा अभ्यास तू कधीं केला आहेस का? तुझ्या कल्याणाची व सुखाची परिसमाप्ति कशांत होणार, हें तुला ठाऊक आहे का?'

निर्झरराजाचे हे तीन सवाल ऐकून, ' नाहीं ! ' म्हणण्यापेक्षा सरितेच्या तोंडून एक अवाक्षरहि निघाले नाही. ती निश्चल उभी होती.

' वेड्या पोरी, मग कां बरं अशी पुरुषावर तुटून पडलीस ! उचलली जीभ लावली टाळ्याला असे करूं नये बाळे. हें पहा. मीच सांगतों त्या तीन प्रश्नाचीं उत्तरें. त्याचे उत्तर एकच—

' पु रु ष '

' ऑं–!–! ! ' सरिता विस्फारित मुद्रेनें उद्गारली. ' होय बाळे. शेवटीं निसर्गानें तुझी गांठ पुरुषाशीं घालण्याचे ठरविलें आहे. तूं अप्रत्यक्षपणें सागराकडे–पुरुषाकडेच चालली आहेस. पुरुषांना शिव्या देतेस, त्यांचा धिक्कार करतेस, पण स्वतः मात्र पुरुषाकडेच धांव घेतेस ! शेवटीं त्या सुखमय सागराशींच तूं समरस होणार आहेस. परमेश्वर करो आणि तें मीलन जगास आनंदमय होवो ! बाळे, स्त्री असो वा पुरुष असो, व्यक्ति दोन

असल्या तरी अंतर्ज्योति एकच आहे. नांवें निराळीं असलीं तरी कर्तव्य एकच आहे बरं ! म्हणून म्हणतों कीं, असा अविचार करीत हिंडू नकोस. '

निर्झराचें बोलणे संपण्यापूर्वीच सरितेचें हृदय प्रेमानंदाने फुलून गेलें होतें. ती तशीच फेसाळल्या प्रवाहाच्या रूपानें हंसत खिदळत गेली आणि सरळ सागरास मिळाली !

—सागर - सरितेच्या त्या मधुर मीलनास संगम म्हणतात !

—स्त्रीपुरुषांच्या मंगल मीलनास लग्न म्हणतात !

सागरसरितेचा तो सुरेख संगम बघून, वरुणाने आकाशांतून पर्जन्य-पुष्पवृष्टि करीत आशीर्वाद दिला - " शुभं भवतु ! "

# सुखी संसार

त्या दोघांचें शिक्षण एकाच शाळेंत झालेलें होतें.

मधून मधून कुसुम आणि कमलाकर यांच्यामध्यें अभ्यासविषयक स्पर्धाहि चालू असायची. डिबेटिंग सोसायटीचा कमलाकर हा सेक्रेटरी असल्यानें, त्याच्या उत्साहपूर्ण मेहनतीनें इतरानाहि डिबेटमध्यें भाग घ्यावा असें वाटल्यास नवल नव्हतें. मात्र डिबेट म्हटला की कुसुम आणि कमलाकर याची अगदीं खडाजंगी उडायची !

आणि तरीहि कुसुम आणि कमलाकर यांची जिव्हाळयाची वागणूक पाहून वर्गांतील इतर मुलांना मोटं कौतुक वाटे. आणि कमलाकरचे काहीं मित्र कमलाकराकडे एका विचित्र दृष्टीने पाहून 'आहे बुवा !' म्हणून टोमणा मारल्याशिवाय राहात नसत.

कमलाकर ह्या 'आहे बुवात' काय आहे हें ओळखत नव्हता असें मुळींच नाहीं. परंतु तो अगदी हेतुपुरस्सरच त्या 'टॉट' कडे डोळेझाक करीत असे. उलट तो एक प्रकारच्या धन्यतेनेंच कुसुमकडे पहात असे. आणि कुसुमच्या मैत्रिणी थोड्या का वस्ताद ! त्यांनाहि तिचे गुपित केव्हांच ओळखलें होते

त्या कुसुमला म्हणायच्या, 'कुसुम, अग किती लपवून ठेवशील आमच्यापासून ! सुपानें सूर्य का कधी झांकला जातो ? सांग की एकदां आम्हीं बोलतों तें खरें आहे म्हणून. नाहींतर बघ हं, आणखी मगळ्याना

सायूं आम्हीं. निमटपणे कबुलीजबाब दे, नाहींतर मग फजिती होईल बापडीची.'

कुसुमच्या मैत्रिणी कुसुमला अगदी पुरेपुरे करून सोडीत. कुसुमला एकदा वाटे कीं, 'खरंच माझं कमलाकरावर प्रेम आहे' असं सांगून मोकळ व्हावं. पण तिचं दुसरं मन तिला म्हणे, 'नको. आज तसा प्रकार स्वमुखाने कबूल केला, आणि उद्यां कमलाकरांनीं कदाचित् माझा स्वीकार केला नाही तर ? मग कुठं राहील माझा आजचा त्यांच्या विषयींचा अभिमान !' आणि म्हणूनच ती स्पष्ट असे कधींच काहीं त्याविषयी सांगत नसे. ती एवढेच म्हणे, 'म्हणा बाई काय वाटेल तें तुम्हांला.'

'अहाहा !—काय साधी भोळी ! म्हणे काय वाटेल ते म्हणा ! समजलं—पाणी खास मुरतंय इथं. ज्या गावच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी बरं कुसुम ! उगीच लपवालपवी आमच्याकडे नाहीं चालायची !' इतर मैत्रिणी कुसुमच्या त्या टाळाटाळीच्या उत्तरावर शेरा मारीत.

मैत्रिणी कमलाकराविषयीं बोलूं लागल्या कीं कुसुमला एक प्रकारची अननुभूत अशी धन्यता वाटे. आपण जर स्पष्ट सांगितलें की, कमलाकराचं आणि माझं एकमेकांवर प्रेम आहे म्हणून, तर त्या पुन्हा आतां प्रमाणें कधींच आपली थट्टा करणार नाहींत, अशी भीति कुसुमला वाटत असल्यानें तिने त्या बाबतींत मूकताच पत्करण्याचें आपल्या मनाशीं ठरविलें.

सहवासाने प्रेम वाढते म्हणतात, तीच गोष्ट कुसुम आणि कमलाकर यांच्यामध्यें रोज घडत असे.

त्यांच्या शाळेंत जायच्या वाटाहि निरनिराळया नसल्याकारणानें एकाच वेळीं एकाच वाटेने तीं दोघेंहि शाळेत येत. मात्र शाळा जवळ आल्यावर दोघांपैकीं कुणीतरी पुढं जावं व कुणीतरी एकानं मागं रहावं, असं चाले.

कांहीं काळानंतर – दोघांचेहि शाळेतील शिक्षण पुरं झालं आणि मॅट्रिक झाल्यावर दोघेंहि एकाच कॉलेजांत जाऊं लागलीं.

कुसुम आतां तिच्या वडीलधाऱ्या माणसांच्या मताने लग्नाची झाली होती. कुसुमच्या वडिलांनीं स्थळें पहायलाहि सुरवात केली होती. तेव्हांपासून मात्र कुसुमच्या हृदयात कालवाकालव सुरू झाली.

कमलाकरापासून तिने ती गोष्ट चोरून ठेवली नव्हती.

‘ कमलाकर, माझं आतां लग्न होणार ! ’ ती म्हणाली.

‘ मग यात विशेष काय ? ती एक क्रमप्राप्त गोष्ट आहे आयुष्यांतली.’ कमलाकर हंसत हंसत म्हणाला.

‘ तुला नाहीं का याचं कांहीं वाटत ? ’

‘ यांत काय वाटणार ? ’

‘ मग तुझं प्रेम नव्हतं माझ्यावर म्हणायंच तर ? ’

‘ असं कुठं म्हटलं मी ? प्रेम नाहीं म्हणणं म्हणजे मी जिवंत नाहीं असंच म्हणावं लागेल.’

‘ मग माझं लग्न होणार, यांत तुला कसं कांहीच वाटत नाहीं ? ’

‘ अग, प्रेमाचा आणि लग्नाचा काय संबंध ? तुझं दुसऱ्या कुणाशीं लग्न झालं म्हणून तुझ्यावरचं माझं प्रेम नाहीसं होणार आहे का कधीं ? कुसुम, माझं मन अजून नाहीं का कळलं तुला ? तुझी शपथ घेऊन सांगतों, मी लग्नासाठीं मुळींच प्रेम केलं नाहीं तुझ्यावर. मात्र त्याचबरोबर हेंहि खरं कीं, जर तुझ्याबरोबर माझं लग्न होईल तर माझ्या जन्माचं सार्थक झाल्यासारखं मला वाटेल. आणि समज नाही झालं, तर मला साऱ्या आयुष्यात चुकल्या चुकल्यासारखं होऊन कांहींतरी न भरून येणारी उणीव राहून जाईल.’ हें बोलतांना कमलाकरच्या चेहेऱ्यावर नैराश्यपूर्ण कारुण्य उमटलेलें कुसुमला दिसलें.

'माझ्याबरोबर लग्न करायची आहे का इच्छा तुझी!' कुसुमनें कमलाकराच्या शर्टचे बटण फिरवीत खालच्या मानेनेंच विचारलें.

तिच्या प्रश्नाने कमलाकरला भडभडून आले आणि डोळ्यांत एकाएकी पाणी भरलें.

'कुसुम, जे शक्य नाही ते कां विचारतेस मला तू!'

'का बरं, असं कां? शक्य कसं नाहीं? तुझी इच्छा नाहीं का माझ्याशीं लग्न करायची!'

'आहे, पण नुसती इच्छा काय कामाची? मला ठाऊक आहे कीं, तुझीहि मनापासून इच्छा आहे माझ्याशी लग्न करायची. पण तुझे बाबा!– ते करतील हीं गोष्ट कबूल!'

'त्याची नको काळजी. मी नाही पर्वा करीत कुणाची!'

कुसुमने आपली खात्री करून घेतली. दोघांनी शपथाहि घेतल्या एकमेकाशीं लग्न करायच्या. आणि तो दिवस दोघांच्याहि मनात आनंद आणि तळमळ उत्पन्न करून मावळला.

एके दिवशी—

कुसुमने वडिलांच्याकडे आपले मन मोकळें केले. कमलाकराशी लग्न करणार असल्याचें ऐकून कुसुमचे वडील कडाडले!

त्यानीं आणि इतरांनीं कुसुमची काहीं साकीबाकी ठेवली नाहीं. कमलाकराच्या जातिभिन्नत्वाची कल्पनाहि त्यांनीं कुसुमला करून दिली.

'तुझ्यासारख्या उच्च जातींतील मुलीनें कमलाकरासारख्या हलक्या जातींतील मुलाशीं विवाह केला, तर पोरी, माझं नाक कायमचं कापलं जाईल. शिवाय उद्या तुला तुझ्या त्या कमलाकराची वागणूक, हलकी विचारसरणी, हलक्या दर्जाचं वातावरण—मुळींच सहन व्हायचं नाहीं. पावलो-पावलीं पश्चात्ताप होईल कारटे, तुला पुढें तुझ्या ह्या आपमतलबी वागण्यानं. विचार कर.'

'विचार अगदी पुरा केला आहे मी. आमचे एकमेकांचे आचार-विचार, आवडीनिवडी, सारं कांहीं एकमेकांस आवडेल असंच आहे. मग मला पुढं पश्चात्ताप कसा करावा लागेल ? आपल्या वागणुकीनं मात्र मला माझं आयुष्य दुःखांत कंठावं लागेल. मला खरं सुख मिळावं असं जर आपल्याला मनापासून वाटत असेल, तर माझं लग्न कमलाकराशींच करा.' कुसुमनें आपला ठाम बेत बिनदिक्कत बोलून दाखविला.

कमलाकराचा प्रकारहि तसाच झाला.

कुसुम कमलाकराशीं लग्न करणार असल्याची बातमी कमलाकराच्या घरातल्या वडील माणसांना कळल्यापासून त्यांनींहि नाना मार्गांनीं कमलाकराचे मन वळविण्याचे प्रयत्न केले, पण व्यर्थ. कमलाकराचा विचार कायम होता.

पण कुसुमच्या वडिलांनीं कांहीं तें लग्न होऊं दिलें नाहीं. आणि त्या दिवसापासून कमलाकराची व कुसुमची भेटहि पण कधीं झाली नाही.

अशाच स्थितींत बरेच दिवस गेले. एके दिवशीं कुसुम कुठेतरी चालली होती. वाटेंतच सहजासहजीं कमलाकराची गांठ पडली.

दोघांनाहि आनंद झाला.

त्याच वेळी त्यांची पुढची बोलणीचालणी झाली.

'ही जातीपातीची आडकाठी नाहींशी करायला काय करावं तेच समजत नाहीं.' कमलाकर म्हणाला.

'नाहीं कसं ? त्याला एकच उपाय आहे. आणि तो म्हणजे स्वार्थत्याग !'

'अग पण तो दोघांनाहि करावा लागेल. उच्चनीच भाव नाहींसा करायला, जातीजातींतील आडपडदा दूर करायला आतां तरुणतरुणींनीं स्वार्थाला लाथच मारली पाहिजे. वडीलधाऱ्यांची व समाजाची टीका सहन करायला मन खंबीर केलं पाहिजे. असली भीति सोडली पाहिजे हें

खरें. पण तसा त्यागहि दोघांना करावा लागेल. एकानं करून चालणार नाहीं.'

'पण तुझी आहे का तयारी समाजावर लाथ मारायची ?'

'एका पायावर ! तूं तयार असशील तर आमच्या प्रमाणेंच उच्चनीच जातींतील मुलामुलींना उदाहरण म्हणून चल आपण दूर-दूर ह्या स्वार्थी, जात्यंध समाजापासून दूर जाऊन राहूं. समाजानें आमच्याशीं कांहीं संबंध ठेवला नाहीं तरी चालेल, पण असल्या जात्याभिमानाला भीक घालून चालणार नाहीं. तरुणतरुणींना कांहीं काळपर्यंत स्वार्थत्याग केला, तर आज नाहीं उद्या हें जातीचं बंड खात्रीनं नष्ट होईल.' कमलाकराच्या विचारसरणीनें कुसुमचें समाधान झालें.

केवळ जातीजातींतील नसता भेदभाव नष्ट करण्यासाठीं कुसुम कमलाकराचं जोडपं त्या गांवांतून दुसरीकडे कोठें जाऊन आनंदानें राहूं लागलें.

आज त्या दोघांचाहि संसार सुखाचा आहे.

परजातीचा नवरा केल्याचा कुसुमला कधींच पश्चात्ताप होत नाहीं.

परजातीची बायको केल्यामुळें कमलाकराच्या आयुष्यात एक प्रकारची मौज आलेली दिसते.

पण हे केव्हां ?—दोघांनींहि स्वार्थत्यागाची तीव्र तयारी केली तेव्हां !

# विकलेला देव

“‘असं काय बरं दादा!—आधीं हा आपला संसार असा फाटका! आणि तशांत तूं जर अशी उधळपट्टी करायला लागलास तर कसं बरं भागेल आपलं? चैन–चैन तरी किती!”

“ताई, आपल्या परिस्थितीची मला कल्पना नाही, असं का तुला वाटतं? पण—”

एवढेंच बोलून शंभू थांबला. त्याला खूप खूप बोलावयाचे होतें. पण का कोण जाणे, त्याने तोंडाबाहेर पडणारे शब्द तोंडांतल्या तोंडात आवरले.

त्याला म्हणावयाचे होतें, ‘अंथरुण पाहून पाय पसरावे माणसानं, असं मीच नेहमीं तुला शिकवीत होतों ना? मग तोच मी आज असा तुझ्या मताप्रमाणं चैनी कसा झालो बरं? मी अशी चैन कां करतों, त्याचा तूं कधी विचार केला आहेस का? मी सांगतों ताई, तूं त्याचा मुळींच विचार केलेला नाहींस; आणि म्हणूनच मला तूं दोषी ठरवितेस!

‘रक्ताचं पाणी करूनसुद्धां स्वतःच्या बायकामुलांचं पालनपोषण सुखानं करतां येत नाहीं, ह्या भयंकर विचारानं संतप्त झालेला एखादा गिरणींतला मजूर जसा स्वतःच्या डोक्यास थोडीशी कां होईना–पण विश्रांति मिळावी नि क्षणभर तरी जिवाला विरंगुळा वाटावा, म्हणून जसा कधीं तरी ताडीच्या पिठ्याची पायरी चढतोच चढतो, त्याचप्रमाणं ताई, मीहि असा चैनी बनलों आहे बरं! माझी मनःस्थिति हेंच ह्या

साऱ्या चैनीचं मूळ कारण आहे ताई! सिनेमानाटकं पाहून पोट भरत नसतं. मला हें कळत नाहीं का? पण अहोरात्र माझ्या भेसूर परिस्थितीची भयाण भूतं माझ्या डोळ्यांसमोर नाचूं लागलीं कीं, त्यांच्या तावडींतून थोडा वेळ तरी निसटून जाण्यासाठींच मी तुझ्या श्रमाचे पैसे हे असे अगदीं—अगदीं आंधळेपणानं पेरतों!"

पण त्यानें ते शब्द बोलून दाखवले नाहींत. एवढेंच केलें कीं, एक निश्वास सोडला नि म्हणाला—

"...मन बेचैन झालं कीं माणसाला आपोआप चैन आठवते!"

शांताला शंभूचे हे कळवळ्याचे नि अंतःकरणाच्या अगदीं तळवरातले बोल ऐकून थोडेसें वाईट वाटलें. उगीच भावाचे मन दुखविलें असें वाटून तिला थोडा पश्चात्तापच झाला. पण तिचाहि नाइलाज होता.

शंभू हा तिचा पाठचा भाऊ. आणि म्हणूनच ती त्याला अगदीं नळहातावरच्या फोडाप्रमाणें वागवीत असे. आपल्या आवडीनिवडी पुरवायला आपल्याला आईबाप नाहींत, असे तिनें त्याला कधींच भासूं दिलें नाहीं. उलट शंभूला संतुष्ट ठेवण्यासाठीं तिनें स्वतःच्या सुखावरहि तुळशीपत्र ठेवायला कमी केलें नव्हतें.

आपल्या बोलण्याचा भलताच अर्थ करून, रागाच्या भरांत शंभू कांहीं बरेंवाईट करून घेईल, ह्या भीतीनें ती पुन्हां म्हणाली,—

"दादा, तूं पैसे खर्च करतोस म्हणून नाहीं बोललें मी— म्हटलं जगांत वागायचं म्हणजे जगासारखंच वागलं पाहिजे नाहीं का? आपली स्थिति काय नि आपण वागतों कसे, याचा विचार नको का करायला?"

"हें पहा ताई—"

शंभूच्यानें आतां मात्र राहावेना. जखमेवर खारें पाणी जसें झोंबतें तसे शांतेचें बोलणें त्याच्या अंतःकरणाला चरचरून झोंबलें. तो थोडासा चवताळल्यासारखा होऊनच बोलूं लागला.

" जग !—जग !!...कां म्हणून मी जगाची पर्वा करावी ? जगानं कुठं केली माझी पर्वा ? मग मी तरी असल्या भिकारड्या जगाला कां म्हणून भीक घालावी ? बस्स मी जर जगाचा कोणी नाहीं, तर जगहि माझं कोणी नाहीं ! "

शंभू मोठ्या आवेशानें आणि करारी वाणीने एक एक शब्द उच्चारीत होता.

शांता फक्त ऐकत होती.

शेवटीं तो विषय बदलावा म्हणून ती म्हणाली,—

" दादा, असं चिडून नि संतापून कसं बरं चालेल ?— कोण ऐकणार आहे आपलं ? आहे का कोणी मायेचं माणूस आपलीं गाऱ्हाणीं ऐकायला ? सांग बरं, कुणावर रागवायचं आपण ? वाऱ्याबरोबर का असं भांडत बसायचं खुळ्यासारखं ? वेडा कुठला ! पावसानं भिजवलं नि सूर्यानं तापवलं–कुणाला मागायची फिर्याद ?—"

शांता त्याचें समाधान करण्यासाठीं म्हणून बोलत होती, तरी त्याचे समाधान न होतां उलट त्याचा मनःसंताप अधिकाधिक वाढतच चालला होता.

स्पिरीटचा दिवा विझविण्यासाठी म्हणून फुंकर मारावी, तों तो अधिकच पेटतो. तसेंच शंभूच्या बाबतींत त्यावेळीं झालें.

शंभूच्या हृदयांतील कालवाकालव नि डोक्यांतील विचारांचे काहूर तिनें ओळखले. थोडासा वेळ तिनें इकडे तिकडे काढला. यावेळीं काहींच न बोलतां शंभू थोडासा शांत झाला म्हणजे त्याला काय सांगायचं तें सांगेन, असा विचार करून ती आपल्या कामाला लागली.

शंभूचें मात्र त्यावेळीं कशाकडेच लक्ष नव्हतें. तो स्वतःशींच कांहीं-तरी पुटपुटत होता. दांतहि चावायचा मधून मधून.

एकदम भडका उडालेला उत्तम, पण आतल्या आंत धुमसत राहाणारी

आग परिणामीं घातकी असते. हें जाणूनच कीं काय, शांताने शंभूच्या त्या धुमसणाऱ्या विचाराग्नीवर हळूंच फुंकर मारण्याचा प्रयत्न केला. ती म्हणाली,–

" हें पहा दादा, अशा वेळीं आपण परमेश्वरावरच हवाला घालून राहिलं पाहिजे. तो जसं ठेवील त्यांतच आनंद मानायला शिकलं पाहिजे माणसानं–"

तिचें बोलणे चालू असतांनाच शंभू म्हणाला,—

" ताई, पुरे झालं तुझं तत्त्वज्ञान ! भरल्या पोटावर ढेंकर देत असताना, मीहि एके काळी असंच तत्त्वज्ञान जगाला सांगत होतों. आता उपाशीं पोटीं हे तत्त्वज्ञान नाही पटत माझ्या मनाला."

" अगदी बरोबर बोललास दादा ! अशा वेळीं असं तत्त्वज्ञान तुलाच नव्हे, कुणालाच पटायचं नाहीं. पण अशा वेळीं जो ते पटवून घेईल, त्यालाच शेवटी जय मिळतो. देवच दीनाचा दयाळू आणि तोच गरिबांचा पाठीराखा आहे दादा."

एखाद्या आजीबाईचा आव आणून मुद्दामच शांता शंभूच्या मनावर नमे बिबवण्याचा प्रयत्न करीत होती. पण शंभू कसला वस्ताद ! तो असल्या पुराणातल्या वांग्याचे कधींच भरीत करून मोकळा झालेला !

देव गरिबांचा पाठीराखा, हे ऐकून मात्र शंभू मोठमोठ्यानें हंसू लागला.

शांताला आश्चर्य वाटले त्या हंसण्याचें. चारी बाजूंनीं आकाशांत ढग भरावे, जोराचा पाऊस पडावा, आणि पाऊस पडत असतांनाच कडकडून पडावे, असा तिला भास झाला. शंभू असा एकाएकीं कां हंसूं लागला, हे तिला कळेनाच मुळीं.

" का असा हंसतोस दादा ?" तिने विचारलें.

" आज तूं तुझ्या देवाचं खरं वर्णन केलंस म्हणून !"

" माझ्या देवाचं खरं वर्णन ?—कसं ? "

" गरिबांचा पाठीराखा म्हणून म्हणालीस ना ? "

" मग त्यांत काय चुकलं ? "

" चुकलं नाहीं—अगदीं बिनचूक आहे तें ! "

" मग हंसतोस कां तर ? "

" एवढ्यासाठींच कीं, जी गोष्ट मी तुला सांगणार होतों, तीच गोष्ट तू स्वतःच्या तोंडानं कबूल केलीस म्हणून ! "

तरीहि शांताला त्याच्या म्हणण्याचा उलगडा होईना. शंभू मात्र सारखा हंसत होता. आणि ती आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे पहात होती.

" काय कबूल केलं मी !—स्पष्ट सांग ना रे दादा."

" सांगूं ताई,—तूं मला वेडा म्हणतेस, पण तूं मात्र माझ्यापेक्षांहि वेडी आहेस खास !—अग तूंच नाहींस कां आतां म्हणालीस, कीं देव गरिबांचा पाठीराखा असतो म्हणून ? "

" हो !—बरं मग ! "

" मग काय ?—असल्या देवावर कोण बरं कसा विश्वास ठेवील ? जो देव पोट न राखतां गरिबांची फक्त पाठच राखतो, असा कुचकामी देव हवा कोणाला ?—तुला खरं सांगूं का ! "

" काय ! " तिनें विचारलें.

" देवानं गरिबांची काळजी केलेली नसून गरिबांनींच आतांपर्यंत देवाची काळजी केली आहे. गरीब जगांत नसते तर देवाला कुणीच विचारलं नसतं ! "

" कांहीतरी बडबडतोस झालं ! जगांत श्रीमंत आहेत म्हणून देव आहेत. श्रीमंतांनींच लाखों रुपये खर्चून हीं देवळं बांधलीं ना ! "

" होय. श्रीमंतांनींच हीं देवळं बांधलीं. पण तीं गरिबांना आणखी नागवण्यासाठीं बांधलीं. गरिबांचे गळे कापून मिळविलेल्या पापाच्या पैशांचा

उपयोग त्यानीं देवळं बांधण्यासाठीं केला. पापाचं परिमार्जन करण्याचा तो एक मार्ग आहे, समजलीस ? शिवाय तोहि एक श्रीमंतांचा धंदा आहे. त्याहि धंद्याच्या कचाट्यांत नेमके गरीबच सांपडतात!–दुर्दैवी बिचारे!!" त्यानें उत्तर दिलें.

" मग तुला काय म्हणायचं आहे ? "

" मला एवढंच म्हणायचं आहे कीं, मी देवावर विश्वास ठेवीन, पण पोटराखा देव असला तर! पाठीराखा देव असला तर तो नालायक देव तुझा तुलाच लखलाभ होवो! दर्शनहि घेणार नाहीं तुझ्या त्या देवाचं! म्हणे पाठी–राखा देव!! तुझ्या या पाठीराख्या देवानं गरिबांच्या अक्षरशः पाठीच राखल्या. पोट राखायची कुवत कांहीं तुझ्या देवाला नाहीं. "

असें म्हणून शंभू मोठमोठ्याने हंसू लागला. पण त्या हंसांत विनोद नव्हता, उपहास होता. आनंद नव्हता, तिरस्कार होता.

देवाचा उल्लेख होतांच शंभू शाताची अशी उपहासात्मक थट्टा कां करूं लागला, यालाहि थोडेसें कारण होतें.

* * * *

शांता नि शंभू ही दोन भावंडे पूर्वी एका खेड्यांत रहात होतीं. त्यांचे वडील त्या गांवचे पाटील होते. अर्थात्‌च त्यांचें बालपण चांगले सुखान गेले होते, हें निराळें सांगायची आवश्यकता नाही.

शांता सरासरी बारा वर्षांची नि शंभू नऊ वर्षांचा असतांनाच त्याचे आईबाप कसल्याशा सांथीनें मरण पावले. त्यांना जवळचें माणूस म्हणून फक्त एक चुलताच काय तो शिल्लक राहिला.

पण—

भुकेलेल्या माणसाला अन्न मिळतांच तो जसा बकाबक तें खाऊन टाकण्याचा प्रयत्न करतो, त्याचप्रमाणें कांहींसा प्रकार ह्या त्यांच्या चुलत्याच्या बाबतींत झाला.

वडील भावाचा—शांता-शंभूच्या वडिलांचा धाक होता, तोपर्यंत हे राजेश्री व्यवस्थित होते. परंतु ते दिवंगत होतांच सगळा पैसाअडका आयताच ह्याच्या हातांत आल्यामुळें, कानात वारा भरलेल्या एकाद्या वांसराप्रमाणे त्यानें गुण उधळायला सुरवात केली.

एकदोन वर्षांतच होतें नव्हतें ते नाना प्रकारच्या व्यसनांत उडवून शेवटी त्यानेंहि राम म्हटले.

पोराच्या आगाखाद्यावरचा खिडुकमिडूकसुद्धां शिलक राहिला नव्हता.

नाही म्हणायला देवाच्या देव्हाऱ्यांत एक सोन्याची बाळकृष्णाची मूर्ति शिलक होती. बाकी सगळे म्हटल्या सगळे त्याने फुंकून टाकले होते.

चुलत्यामागें शांता-शंभूला सुखाचा घास मिळणेहि मोठें कठीण होऊं लागलें. तशाच बिकट स्थितींत त्यांनी त्याच गांवात आणखी कांहीं वर्षे काढली.

इतक्या हालअपेष्टा होत्या, तरी शांतेच्या देवपूजेंत कांहीं खंड पडत नसे. उलट जों जो परिस्थिति जास्त जास्त बिकट भासूं लागली, तों तो शांताचे पूजा-प्रकरण जास्त जास्त वाढूं लागले.

शंभूचा स्वभाव जरासा चमत्कारिक होता पहिल्यापासून ! त्याला नव्हते तें शांताचें प्रस्थ आवडत. तो पहिल्यापासून शांताला म्हणायचा,—

" ताई, कसली करतेस पूजा ? इकडे लोक आपली पूजा करीत असतांना तूं देवाची पूजा करीत बसतेस, याला म्हणाव तरी काय ! "

त्यावर ती म्हणे—

" तुला नाहीं ना त्याचा त्रास होत ?—अरे आज ना उद्या तो देवच पावेल आपल्याला नि आपण सुखी होऊं."

तिच्या आईनेंच तिला लहानपणापासून हें वळण लावल्यामुळें पुढें तर तिला ते सोडतांच येईना. कारण तीच आतां वडील होती. मात्र त्या गांवात अब्रूनें जगणें दिवसेंदिवस तिला कठीण वाटूं लागलें.

गरीबाला गोत नसते असें म्हणतात, तें तिच्या पावलोपावलीं प्रत्ययाला येऊं लागलें.

गावांतल्या गांवगुंडांनीं शांताला आपल्या जाळ्यात ओढून तिच्या तारुण्याचा नि सौंदर्याचा लिलाव पुकारण्याचा कट केला. चारी बाजूंनीं दैव कसें हात धुऊन मागें लागलें त्याच्या !

शेवटीं तिनें निश्चय केला आणि त्या नरकांतून बाहेर पडण्यासाठीं कुणाचीशी सोबत पाहून शंभूसह मुंबईंत प्रवेश केला.

*　*　*　*

मुंबईंत गेल्यावर काबाडकष्ट करून चार पैसे मिळवितां येतील, अशी शंभूलाहि खात्री होती.

मुंबईला आल्यावर शंभूनें नोकरीसाठीं खटपट चालविली. पण त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. शेवटीं शेवटीं कंटाळल्याच तो जिवाला ! आपण होतो कोण नि झालो कोण, याच विचारांनीं त्याला जेरीस आणलें.

नाहीं म्हणायला त्याला मातीच्या मूर्ति करायचा नाद होता. तोच शेवटीं त्याच्या उपयोगी पडला.

लौकरच गणेशचतुर्थी येणार होती, म्हणून जिकडे तिकडे गणपतीचे कारखाने सुरू झाले होते. त्यांपैकींच एका कारखान्यांत गणपतीचे डोळे उघडायचे काम त्याला मिळालें.

त्याला त्या कामाची मोठी गंमत वाटली. तो शांताला म्हणाला, "पाहिलंस ताई, मी आतां साधासुधा माणूस राहिलो नाही बरं का ! मी आतां देवाचाहि देव बनलों आहे. प्रत्यक्ष देवाचेहि डोळे मी उघडतो—देवालाहि मी दृष्टि देतों !"

त्यावर ती म्हणाली—"आहे मला ठाऊक ! तूं देवाचे डोळे उघडीत असलास तरी तुझे डोळे मात्र अजून उघडले नाहींत."

तें ऐकून शंभू खो-खो हंसला. बहिणीच्या बोलांची भावाला जितकी गंमत वाटावी तितकी त्याला वाटली.

शंभूला नोकरी मिळाली तशी त्याच दरम्यान शाताचेहि सौंदर्य एका कलावंताच्या नजरेंत भरून, त्यानें तिला आर्ट-स्कूलमध्यें मॉडेल म्हणून बसायची नोकरी देवविली.

शांता तशी कांहीं फारशी देखणी नव्हती. पण तिचे अवयव मात्र अगदीं जिथल्यातिथें नि रेखीव होते. नीटस नाकडोळे, गोंडस शरीरयष्टि, ठसठशीत बांधा नि मध्यम उंची, हेंच तिचें सौंदर्य. पण चित्रकारांना लागणारा ' कट् ' तिच्यांत होता.

नोकरी मिळाली—दिवसाला दीड रुपया वेतन मिळणारी नोकरी मिळाली, त्या दिवशीं तिला अतिशय आनंद वाटला.

पण—

तिला ती नोकरी आवडेना. शेंकडों स्त्रीपुरुषांत ते सांगतील तसे आविर्भाव करून कधीं नग्न तर कधीं अर्धनग्न अशा स्थितीत बसायचें अगर उभें राहायचें, हे कुठल्या सभ्य मुलीला आवडेल ?

तिचा आनंद क्षणिक ठरला ! दोनच दिवस मॉडेल म्हणून मोठ्या नाइलाजानें बसून तिनें त्या आर्ट-स्कूलला कायमचा रामराम ठोकला.

शंभूची नोकरी तरी काय ?—आळवावरचें पाणी ! गणेशचतुर्थी झाली आणि शंभूची नोकरी सुटली. गणपती पाण्यांत गेले तसे शंभूचे श्रमहि पाण्यांत गेले. कारण नोकरीचे कांहीं पैसे मिळाले व कांहीं पैसे बुडाले नि अखेर कारखानेहि बंद झाले !

तितक्या अवधींत त्यानें देव्हाऱ्यांतल्या देवासारखी एक मातीची मूर्ति करून व तिला सोनेरी रंग चढवून अगदीं खऱ्या सोन्याच्या मूर्तीसारखीच करून ठेवली होती.

शांता मुंबईस आली तेव्हां तिनें आपला देव्हाराहि आणला होता.

त्यांच्याकडे सोन्याची मूर्ति आहे हें कोणालाच ठाऊक नव्हतें. आणि जरी कोणाला कळलं असतं, तरी असल्या भिकारड्यांकडे सोन्याची मूर्ति असेल हे कोणाला खरेंहि वाटलें नसते ! ज्यांनीं ज्यांनीं ती मूर्ति पाहिली होती त्यांना त्यांना ती पितळेची असेल, असें वाटत असे.

एके दिवशीं अचानकपणे शंभू स्वतःसाठीं व शांतासाठीं बरेचसे कपडे, अत्यावश्यक असे दागिने, कांहीं संसारी भांडीं आणि इतर थोडेंसें सामानसुमान घेऊन आला.

तें पाहून शांता थक्कच झाली ! तिला वाटलें, शंभूला कोठें तरी मोठ्या पगाराची नोकरी मिळाली आणि त्याने आगाऊ रक्कम घेऊन हें सारें सामान आणलें असावे !

शंभू अगदी आनंदांत दिसत होता. आणि तो शांतालाहि आनंदी बनण्याचा आग्रह करीत होता.

तिला त्या साऱ्या प्रकाराचा अचंबाच वाटला ! तिनें त्याला विचारलें,—

" दादा, हें सारं कसं आणलंस ? कुठले आणलेस एवढे पैसे इतक्या जिनसाना ? "

" ताई, हे निदान आज तरी तूं मला विचारूं नकोस ! एक दिवस तरी असूं दे मला जरा आनंदांत ! दारिद्र्य—दारिद्र्य आहेच जन्मभर आपल्या वांट्याला ! "

" नाहीं—दादा, सांग सांग ! कुठून आणलंस तूं हें सारं ? " ती अधिकच घाबरून गेली. कारण आपली समजूत खोटी असेल, असा तिला संशय आला.

" कुणी दिलं हें तुला ? " तिनें अगदीं अधीरतेनें विचारलें.

" कुणी दिलं ?—तुझ्या देवानं ! " शंभूनें हंसत हंसतच उत्तर दिलं.

" देव पावला नि त्यानं आपल्याला हें दिलं ! देव गरिबांचा पाठीराखा असतो ! ! " शंभूनें परत खोंचून उत्तर दिलें.

शंभूला मोठ्या पगाराची नोकरी मिळाली असेल वगैरे वगैरे कल्पना खऱ्या असाव्यात असें तिला परत वाटूं लागलें. थोडासा आनंद, थोडीशी भीति यामुळें ती अगदीं गोंधळून गेली होती. काय करावें ते कळेनाच थोडा वेळ तिला. शेवटीं ती खरोखरच देवाची कृपा असेल असें समजून, सारें सामान जिथल्या तिथे टाकून लगबगीनें आधीं देव्हाऱ्याकडे धांवली.

शंभूहि मागोमाग हळुहळू गेला.

शांता हात जोडून देवापुढे बसलेली त्याला दिसली. ती अत्यंत घाब-रलेली दिसली त्याला. ती अगदीं स्तब्ध होती देवाकडे टक लावून. डोळ्या-वाटे अश्रुधारा वहात होत्या. तिच्या त्यावेळच्या दृष्टींत भूतकाळच्या साऱ्या स्मृति सांठलेल्या होत्या.

" ताई, एकसारखी किती टक लावून पहातेस देवाला ? " शंभूनें विचारलें.

त्याच्या प्रश्नानें तिची स्मृति भग पावली.

" खरंच किती वेडी मी ! " डोळे पुशीत पुशीत तिने उत्तर दिलें. अश्रूरहित नजरेनें पुन्हां एकदा तिने देवाकडे पाहिलें.

ती दचकली नि तिने एकदम झपाट्यानें मागें वळून शंभूला विचारलें,

" दादा, आपला देव कुठं ? "

" म्हणजे ? हा काय देव्हाऱ्यांत ! " देवाकडे बोट दाखवून शंभूहि तितक्याच घाईघाईनें उत्तर देऊन तिथून काढता पाय घेण्याचा विचार करूं लागला.

शांताला संशय आला त्याचा. तिनें ती मूर्ति हातात घेतली. तोंच तिच्या हातांत देवाची मान मोडून पडली. शांता चपापली—बावरली. धस्स झालं तिच्या काळजांत !

" दादा—! ! " विस्फारित नजरेनें शंभूकडे पहात ती एकदम ओरडली !

"दादा–दादा, आपली सोन्याची मूर्ति कुठं आहे रे! काय केलंस तूं त्या मूर्तीचं?" ती ढळढळां अश्रू ढाळूं लागली. शंभू तटस्थ होता.

"बोल ना रे दादा, देव कुठं आहे?"

"तुझ्या हातांत!"

"हा देव–' हा मातीचा देव?"

"हे पहा ताई, देव म्हणजे देव! सोन्याचा असला तर तो देव नि मातीचा असला तर तो देव नव्हे, असं कुणी सांगितलं तुला? वेडी कुठली!"

शंभू अगदीं कांहींच झाले नाहीं असे समजून बोलत होता. शांता मात्र ओक्साबोक्सी रडत होती.

"दादा, भलत्या वेळी कशी रे थट्टा सुचते तुला? सांग रे, देव कुठं आहे?" तिने रडत रडतच विचारलें!

"ताई, तुझा देव गरीबांच्या पाठी राखायला गेला आहे, आणि माझा देव हा पहा असा गरीबाची पोटं राखायला धांवून आला आहे."

खुळकन् फाटक्या सदऱ्याच्या खिशातले रुपये वाजवीत शंभूनें उत्तर दिले. त्याच्या अंगात त्यावेळी कांहींतरी संचारले असावे, असाच त्यावेळीं त्याला पहाणाऱ्याना भास झाला असता! शांताची समजूत घालण्यासाठीं म्हणून तो म्हणाला,—

"ताई, हें पहा अशी रडूं नकोस. तूं आजपर्यंत कुठल्या देवाची पूजा करीत होतीस तें आज मला कळलं. तूं पूजा करीत होतीस ती देवाची नसून सोन्याची होती. होय ना? देवाचीच पूजा करायची मग सोन्याची मूर्ति काय किंवा मातीची मूर्ति काय, दोन्ही सारख्याच! तूं कष्टी झालीस ती देवासाठीं नसून सोन्यासाठीं झालीस? सोनं गेलं म्हणून तूं रडतेस, होय ना?"

मातीची मूर्ति फेंकून, एका कोंपऱ्यांत जाऊन शांता रडतच होती. शंभू तिच्याजवळ जाऊन बसला नि म्हणाला,—

"हे पहा— ताई हे पहा त्या देवानं आपल्याला किती रुपये दिले ते ?" असें म्हणत त्यानें त्या नोटा नि रुपये तिच्या पुढ्यांत फेंकले.

"या पैशांनीं आपण काय करणार नाहीं ताई ! इतकं भांडवल यापूर्वी मिळालेलं असतं, तर असे हाल काढण्याची पाळी आपल्यावर खात्रीनं आली नसती ! स्वतःच्या बेंबींत कस्तुरी असतांना, कस्तुरीच्या वासासाठीं रानंच्या रानं पोटाखालीं घालणाऱ्या कस्तुरी-मृगासारखी आपली गोष्ट झाली. यापूर्वींच ती मूर्ति विकण्याची सुबुद्धि मला झाली असती, तर किती छान झालं असतं ! ताई, चल ऊठ. पूस आधी ते डोळे. आता लौकरच गणेशचतुर्थी येणार आहे. या भांडवलानं मी आतां गणपतीचा कारखाना काढतो."

शंभूच्या प्रत्येक शब्दाने शांताच्या मनावर कसला तरी आघात होत होता. त्याचे ते हिंमतीचे बोल ऐकून शेवटीं तिचें दुःख ओसरलें !

दिवसामागून दिवस गेले.

शंभूनें गणपतीचा कारखाना सुरू केला.

त्याच्या कौशल्यामुळें मूर्तिकार म्हणून त्याचा नांवलौकिक वाढू लागला. होतां होतां मातीच्या मूर्ति करणाऱ्या शंभूकडे राजेरजवाड्यांच्या लहानमोठ्या पुतळ्यांच्याहि ऑर्डर्स येऊं लागल्या.

नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां त्यानें बरीच माया जवळ केली.

आतां—

शांता अर्थातच सुखी आहे यांत शंका नाहीं. उलट मुंबईतच कुठें तरी एकादी लहानशी बिल्डिंग बांधावी, याच विचारांत सध्यां ती आहे. विकलेल्या देवाबद्दल आतां तिला वाईटहि वाटत नाहीं नि त्याची तिला आठवणहि नाहीं.

शेजारच्या बायका रोज संध्याकाळीं देवळांत जात असतांना तिला दिसल्या कीं ती स्वतःशींच म्हणते,—"डॉ. आंबेडकरांनीं मंदिरप्रवेशाची चळवळ चालवली होती. तशी मंदिरबंदीची चळवळ कुणी सुरू कां करीत नाहीं ?"

---

# स्त्रियांची चळवळ

विचार करणें हें शहाणपणाचें लक्षण असते, अति विचार करणे हें मूर्खपणाचे लक्षण असतें, आणि अल्प विचार करणे म्हणजे महा-मूर्खपणाच ! ‘ महिला महासभा ’ ह्या स्त्रियांच्या संस्थेच्या हातून असाच महामूर्खपणा झाला.

‘ महिला महासभा ’ ही स्त्रियांनीं स्थापन केलेली व स्त्रियासाठीं स्त्रियांनींच चालविलेली एकुलती एक संस्था होती. त्या संस्थेतर्फे मोठ-मोठ्या पुढाऱ्यांची नि प्रसिद्ध व्यक्तींची खास स्त्रियांसाठीं व्याख्यानें होत असत. तसेंच एकदा सरोजिनी नायडूंचें व्याख्यान ठरलें. विषय होता ‘ स्त्रियांचे कार्यक्षेत्र ! ’

सरोजिनी नायडूंचें व्याख्यान ऐकायला येण्याऐवजीं त्या कशा दिसतात हें पाहायलाच संस्थेचे सर्व स्त्री-सभासद आपापल्या सुनांलेकींसह उपस्थित झाल्या होत्या. कदाचित् विषयापेक्षां व्यक्तीचेंच महत्त्व त्यांना वाटले असेल ! कुमारिका, सधवा, विधवा अशा तिरंगी महिलांच्या नानारंगी वेषभूषेमुळें सभागृह अगदीं रंगीबेरंगी आणि रंगदार दिसत होते. आबालवृद्ध महिलांनी हॉल अगदीं फुलून गेला. आणि त्यांनीं माळलेल्या फुलवेण्यांच्या सुवासाचा घमघमाट सुटला.

ठराविक वेळेला सरोजिनी नायडू आल्या. व्याख्यान सुरू झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत एक महत्त्वाचा मुद्दा सांगितला. त्या म्हणाल्या—

"पुरुषांप्रमाणं सर्व कार्यक्षेत्रांत स्त्रियांनी आपली कर्तबगारी दाखविली पाहिजे. उद्योगधंद्यांतहि स्त्रियांनी पडलं पाहिजे."

सरोजिनीदेवींनीं सरासरी तासभर आपलें तोंड वाजविलें नि त्या हार-तुरा घेऊन निघून गेल्या. जमलेल्या बायकांनी मधून मधून टाळ्या वाजवल्या आणि आपल्या लेकीसुना घेऊन निघून गेल्या ! परंतु अध्यक्षीणबाईंच्या डोक्यात मात्र त्या व्याख्यानामुळे विचाराच्या लहरी सुरू झाल्या. बाकीच्या स्त्रीसभासदाच्या बाबतींत नेहमींप्रमाणेंच–म्हणजे 'नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेले वारें' असेंच झालें !

अध्यक्षीणबाई आपल्या विचारांना कृतींत उतरविण्यासाठीं सारख्या तळमळूं लागल्या. कारण 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' हे समर्थांचें बोधवचन त्यानीं लहाणपणी अगदी घोकून घोकून पाठ केले होतें. आणि त्यांची स्मरणशक्ति त्याच्या देहाप्रमाणेच दांडगी असल्यामुळे त्या तें अद्यापहि विसरल्या नव्हत्या.

त्याना मुळीच चैन पडेना. लगेच त्यांनीं आपल्या संयुक्त चिटणीसाचे त्रिकूट बोलाविलें. आणि त्याच्याशीं बराच वेळपर्यंत महत्त्वाचें बरेंच खलबत केलें. नाही होय करता करता शेवटी एक दुकान काढायचें ठरलें ! तिन्हीं चिटणीसांनी आपापली अक्कल चालवून त्या तिहेरी मेंदूतून एक फक्कड नाव शोधून काढलें दुकानासाठीं. "महिला—वस्तु—निकेतन."

झालें. जागा—अगदीं रहदारीच्या रस्त्यावर एका टोलेजंग अशा सुंदर इमारतींत एक जागा घेतली. आणि सरोजिनीदेवींच्या उपदेशाप्रमाणें 'महिला महासभे'च्या नेतृत्वाखालीं त्यानीं भर रस्त्यावर दुकान मांडलें.

गावभर गवगवा झाला. सरकशींतलीं जनावरें ( शिकारखाना ) पाहायला लोक जमतात, त्याप्रमाणेंच तें बायकाचें दुकान आणि त्यांत काम करणाऱ्या तीन महिला पहायला झुंडीच्या झुंडी जमूं लागल्या !

ज्याच्या त्याच्या तोंडी एकच विषय—आणि तो म्हणजे ‘ महिला वस्तु निकेतन ! ’

बायकाचें तोंड म्हणजे एक जाहिरातीचें जिवंत साधनच असतें असे म्हणायला हरकत नाहीं. आणि हें तर बोलून चालून बायकांच्या संस्थेचें बायकांनीच उघडलेले दुकान ! मग काय विचारतां ? त्या दुकानासाठी त्यांना कोणत्याहि प्रकारची जाहिरात करावी लागली नाही. जाहिरातीवांचून जाहिरात होऊं लागली आणि ‘ महिला वस्तु निकेतन ’ मोर दणक्यात नि झोकांत चालूं लागलें.

महिला आता पुरुषाच्या बरोबरीने धंद्यात पडल्या हे पाहून अध्यक्षीणबाईंचा जीव भांड्यात पडला ! त्याना हायसे वाटले—आनंद वाटला ! थोरामोठ्यांनीं अगदी आठवणीने शुभसंदेश पाठविले. कांहीं पिकल्या पानांचे आशीर्वादहि आले !

पण पुढे मात्र भलतेंच झाले.

बायकांच्या दुकानात बायका येण्याऐवजीं पुरुषच जास्त येऊ लागले. त्यात शेकडेवारी काढली तर मुलें–तरुण व पोक्त–वृद्ध यांचे प्रमाण अनुक्रमें दहास नव्वद असे पडे ! आणि बायका गिऱ्हाइकांचें प्रमाण शेंकडा शून्य ! !

तें दुकान उघडल्यापासून बायकांना हव्या असलेल्या वस्तु नवरे लोक आपोआपच घरांत आणून टाकूं लागले. महिनाभर टकली करून नि रात्रंदिवस तगादा लावला असतांहि ‘ पुढच्या पगाराला आणूं ह ’ अशी गुळगुळीत थाप मारून वेळ मारणारे नवरे, न सांगतांहि हव्या असलेल्या वस्तूबरोबरच नको असलेल्या वस्तूहि आणून आपापल्या राणीसाहेबाची समाधानी करूं लागले. इतकेंच नव्हे, तर आणखी कांहीं आणूं का ? असा दिलदार मनाचा सढळ सवालहि करूं लागले. बोलून चालून बायकाच त्या ! त्यांचें ‘ आणा ’ हें कांहीं संपायचें नाहीं !

त्यांची यादी रोजच्यारोज मारुतीच्या शेपटासारखी वाढत चालली. ' महिला—वस्तु—निकेतनां 'त नवऱ्यांच्या खेपाहि वाढूं लागल्या.

सर्वसाधारण पुरुषांच्या येण्याला चक्कर किंवा फेरी म्हणून ' निकेतन ' मधील बायका त्यांची आपापसांत टवाळी करीत. आणि देशभक्ताच्या येण्याला ' भेट ' म्हणून " महिला—वस्तु—निकेतनला अमक्या अमक्याची भेट " म्हणून वर्तमानपत्रांत जाहीर करीत. वर्तमानपत्रांचे संपादक हेसुद्धां पुरुषच असल्यामुळें ' महिला—वस्तु — निकेतन 'चा कोणताहि मजकूर ठळक ठिकाणी व ठळ्ळळीत अक्षरात प्रसिद्ध होत असे. संपादकमहाशयांच्या ह्या उदारपणाला ' स्त्री—दाक्षिण्य ' असें म्हणतात.

असें किती दिवस चालणार ? ' बायकांचें दुकान ' हा विषय जुना झाला नि त्या ऐवजीं ' बायकांच्या दुकानांत पुरुषांची गर्दी ' हा विषय चर्चेचा झाला !

त्या संस्थेच्या तिन्ही चिटणीस महिला विक्रेत्या म्हणून पाळी पाळीने काम करीत. त्यांत एक कुमारिका, एक सौभाग्यवती व एक गंगाभागिरथी— अशा तीन तऱ्हेच्या तीन स्त्रिया होत्या. दुकान बायकाचें असलें, तरी आपली बायको एकटी दुकानांत असताना पुरुष गिऱ्हाइकें येतात, हें कांहीं सौभाग्यवतीच्या नवरोजींना आवडेना. कारण चोरांचीं पावलें चोरालाच कळतात असें म्हणतात; त्याप्रमाणें पुरुषांचा स्वभाव पुरुषालाच समजतो. त्यानें शेवटीं आपल्या बायकोला त्या दुकानातून काढली. इतकेंच नव्हे तर त्यानें तिला राजीनामा द्यायलाहि भाग पाडलें. आतां राहतां राहिल्या कु. नि गं. भा. !

पाल्हाळ न लावतां थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्या कु. चेंहि तसेंच झालें. रोज दिवसांतून तीनदां कांहींना कांहीं खरेदी करण्याच्या निमित्तानें दुकानाचा उंबरठा झिजविणाऱ्या एका तरुण उल्लू विद्यार्थ्याबरोबर कु. चें

मेतकूट जमलें ! नि ती कुरूप असतांहि तिचें त्याच्याशीं लग्न झालें ! अर्थात् तिनेंहि त्या दुकानाला व संस्थेला कायमचा रामराम ठोकला. वास्तविक तिला कांहीं त्या दुकानाविषयीं आस्था नव्हतीच. लग्न होत नव्हतें—कसा तरी वेळ घालवून कशांत तरी मन गुंतवायचें—म्हणून ती तें काम करीत होती इतकेंच !

हां हां म्हणतां दोन चिटणीस महिला गेल्या. त्यांच्या ऐवजीं दुसऱ्या महिलांची चिटणीस म्हणून निवड झाली. पण त्या दुकानांत काम करायला तयार होईनात. कारण दुर्दैवानें त्याहि सौ. च होत्या. ग. भा. चिटणीस मात्र खंबीर होती. तिनें दुकानाची सर्व जबाबदारी आपल्या अंगावर घेतली. कांहीं झालें तरी आपण दुकान चालवणार, असा दृढ निश्चय केला. तिची चिकाटीच तशी होती.

तरुणपणीं वैधव्य आलें असतांहि तिनें पुनर्विवाह करण्याचें साफ नाकारले होतें. कारण एकदां आलेल्या अनुभवाची पुनरावृत्ति करून घ्यायला ती तयार नव्हती. परंतु दिवसेंदिवस तिला तो दुकानाचा गाडा ओढवेना. एकटीच्यानें दुकानाचा जंजाळ सांभाळणे शक्य होणार नाहीं असें पाहून, तिने केवळ संस्थेच्या दुकानाला स्थैर्य आणण्यासाठी म्हणून पुनर्विवाह करण्याचें ठरवलें. आपण दुकान सांभाळूं, नवरा घर साभाळील, असा तिचा तर्क होता.

‘ वर पाहिजे ’ म्हणून तिनें एक जाहिरात दिली. मिळवती बायको कुणाला नको असते ? अर्जांचीं पुडकीं येऊन पडलीं ! शेंकडों फोटो आले !! कांदे बटाटे निवडून घेतात तसे तिनें फोटो निवडले नि एक वर पसंत केला. तिचें लग्न झालें. ध्येयनिष्ठेसाठीं तिनें लग्नाची बेडी अडकवून घेतली, म्हणून स्त्रीसभासदांनीं तिची वाहवा केली. तिलाहि मूठभर मांस चढलें ! दुकानाच्या भरभराटीचीं कल्पनाचित्रें तिच्या डोळ्यांसमोर नाचूं लागलीं. पण ती सौ. झाली होती हें ती अजिबात

विसरली होती. पुरुष नव्हे—नवरे इथून तिथून सगळे सारखेच ! मग हा नवा नवरा तरी कसा अपवाद असेल ? त्यानेंहि तिला काम करण्याची बंदी केली. कारण गिऱ्हाईकें सगळीं पुरुषच ! तिचा नाइलाज झाला नि तिनेंहि राजीनामा दिला. सगळें उलटें झाले. आतां ती घर सांभाळूं लागली नि तें दुकान शेवटीं स्वतःच खरेदी करून तो दुकान सांभाळूं लागला.

स्त्री–विक्रेत्यांची वजावाकी होत होत शेवटीं त्या वजावाकीचें उत्तर आले—' पुरुष ! '

पूर्वी तीन बायका काम करीत असत—आतां एक पुरुष काम करू लागला. गणिताच्या भाषेंत सांगायचे म्हणजे तीन बायका = एक पुरुष असें समीकरण झाले.

परत गांवांत गलबला झाला. ' बायकांचं दुकान पुरुष चालवतो ! ' पण आश्चर्य हे कीं, तेव्हांपासूनच त्या दुकानांत बायकांची गर्दी होऊ लागली. स्त्रिया दुकानात काम करीत, तेव्हा पुरुष गिऱ्हाईकें येत. पण आता पुरुष दुकान चालवू लागल्याबरोबर स्त्री गिऱ्हाइकें मुंग्याप्रमाणें जमू लागलीं. खरें सांगावयाचे तर आताच ते खरे बायकांचें दुकान झालें होतें. स्त्रिया ते दुकान चालवीत तेव्हां लोक त्याला ' पुरुषाचें दुकान ' असे म्हणत ! आता पुरुष तें दुकान चालवूं लागला तेव्हा त्याला ' बायकांचं दुकान ' असे म्हणतात ! !

# रानमाणूस

मुंबई कांहीं त्यानें अजून पाहिली नव्हती. पण मुंबई कशी असेल, याची त्याला कमालीची कल्पना होती. मुंबईच्या स्वरूपाविषयीं अनेक आराखडे नि अंदाज त्यानें अगोदरच आंखून ठेवले होते.

मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं असे म्हणतात! मेलेला माणूस कांहीं स्वर्ग कसा आहे तें सांगायला परत येत नाहीं. तरीसुद्धां स्वर्गांतल्या नंदनवनाचीं, यक्षगंधर्वांचीं नि अप्सरा-पऱ्यांचीं रंगेल वर्णनें कवींनीं केलींच कीं नाहीं! ते कुठें गेले होते स्वर्ग पहायला!

आमच्या नानूचीं मुंबईविषयींचीं कल्पनाचित्रें तशींच होतीं. प्रत्येक माणूस किंचित् कवि नसतो का!

नानूच्या कल्पनासृष्टींतली मुंबई इतकी वैभवशाली होती, कीं कवीच्या कल्पनासृष्टींतील नंदनवनसुद्धां तिची बरोबरी करूं शकलें नसतें.

*　　*　　*

आज तो प्रथमच मुंबईला आला होता. भाऊच्या धक्क्यावरून घरीं—गिरगांवात येईपर्यंत अनेक दृश्यें दिसलीं त्याला. तो कल्पनासृष्टीं-तल्या मुंबईशीं प्रत्यक्ष मुंबई पडताळून पाहूं लागला—आणि काय असेल तें असो, त्याला त्यांत विलक्षण साम्य दिसूं लागलें.

गाजरपारखी जगाची पारख पूर्णपणें नसलेला नानू, खुशींत गाजरें खाऊं लागला. जाळण्यासाठीं म्हणून नेत असलेल्या प्रेताला उन्हाचा

त्रास होऊं नये, म्हणून त्याच्यावर छत्री धरणारे लोक किती दयाळू असतील याची त्यानें मनाशीं कल्पना केली. आणि स्वतःला धीर देत स्वतःशींच म्हणाला,—

" बेट्या नानू, घाबरूं नकोस ! इतक्या हळव्या अंतःकरणाचीं हीं देवमाणसं तुला—एका जिवंत माणसाला दूर का लोटतील ?

व्हिक्टोरियाचा घोडा भरधांव धांवत होता. नानूचें आशाळू मन घोड्यापुढें धांवत होतें.

एकाद्या धर्मशाळेंत उतारू येतात नि जातात, तसेच नानूच्या डोक्यांतहि नाना विचार येत नि जात. अशा अनंत विचारांची अखंड ये-जा चालू असतांनाच नानू मामाच्या बिऱ्हाडीं येऊन पोंचला.

" मामा—" नानूनें हांक मारली.

आंतून ' ओ ' आली नि मामा दरवाजा उघडून बाहेर आले. लगेच चरपांगीं आनंदाचा आविर्भाव आणून त्यांनीं खुशाली बिशाली विचारण्याचा औपचारिक विधी उरकला. पण नानू आलेला पाहून मात्र त्यांना कसेंसेंच झालें. कारण नानू त्यांच्या ऐटबाज डामडौलाला शोभण्यासारखा नव्हता. मामांच्या घरांतला ' रामा ' गडीसुद्धां एकादा ऑफीसर दिसला असता ! त्यांच्या दृष्टीनें नानू रानटी—अगदीं रानमाणूस होता !

अर्थात् असला इरसाल अवतार—भाचा असला म्हणून काय झालें ? —मामांना आपल्या घरांत ठेवून घेणें लाजीरवाणें वाटलें. आणि मग—

"......काय सांगणार नानू, तूं अशा चमत्कारिक वेळेला आलास कीं कांहीं विचारूं नकोस ! आमच्या या बिल्डिंगमध्यें आहे टायफॉईडची सांथ ! आणि टायफॉईड म्हणजे काय ?—बोलून चालून स्पर्शजन्य ताप तो !......तशांत तूं परगांवहून आलेला !......न जाणो, काळ वेळ कांहीं सांगून येत नाहीं. म्हणून म्हणतों—अशा धोक्यांत तू राहूं नये

हें बरं. दुसरीकडे कुठं तरी तुझी सोय कर. बाबा—जीव सलामत तर सगळं.........."

नानूच्या जिवाची काळजी करण्याचा फार्स करून त्याची धिंडका कशीतरी एकदां घालवून देण्यासाठीं, मामांनीं धडधडीत थाप मारली.

पण नानू कसला बिलंदर! त्याच मामांचा भाचा तो!! त्यानें मामांचा इरादा ओळखला नि त्यानेहि मामांना चार गोष्टी सुनावल्या. होतां होतां तूं मी झालें नि शेवटीं श्रीमंत मामानें गरीब भाच्याला चहाचें पाणीहि न देता हाकलून दिला.

बोचकें हातात घेऊन नानू निघाला.

पण 'आतां कुठं जायचं?' हा प्रश्न त्याच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. ना कोणी ओळखीचें ना देखीचें! त्याला वाटलें—आपल्या माणसांनीं परकेपणा दाखवल्यावर परकी माणसें आपलेपणा कशीं दाखवतील?—ब्रह्मांड आठवूं लागलें त्याला. अशा विचारतंद्रींत एक एक पाऊल टाकीत असतांना त्याचें एक मन त्याला दोष देत म्हणालें,—

"छे— चूक झाली! मामांना उलट बोलणं हें काहीं बरं नाहीं. लहान तोंडीं मोठा घांस घेतांना थोडा तरी विचार करायला हवा होता. वडील माणसं बोलतात तें आपल्या हितासाठींच ना!"

पण लगेच त्याचें दुसरें मन म्हणालें,—

"कसली माणसं नि कसलीं वडील माणसं! झालं तेंच योग्य झालं! माणसांत माणुसकी निर्माण करण्यासाठीं माणुसकीसुद्धां सोडली पाहिजे माणसानं!"

इतक्यांत—

"नानू—!" कुठून तरी ओळखीच्या आवाजाची हांक नानूच्या कानीं आली.

- त्यानें मागें वळून पाहिलें. ती हाक रतनची होती.

" रत—न ! " थोड्याशा भांबावलेल्या स्थितींत नानू आनंदानें उद्गारला.

" नानू , तू इकडं कुठ आलास ? " रतननें नानूची विचारपूस करायला सुरवात केली. नानूनेहि झालेला सर्व वृत्तांत तिला सांगितला. रतनचें अंतःकरण दयेनें पाझरलें. ती त्याला म्हणाली,

" कांहीं हरकत नाहीं. तं चल माझ्याकडे. " ती त्याला आपल्याकडे घेऊन गेली.

त्या दिवसापासून तो रतनच्या खोलींत राहूं लागला.

" परकी माणसंच प्रसंगीं आपली होतात ! " त्याचें मन त्याला तेव्हांपासून सारखे बजावूं लागलें. आणि तें कांहीं खोटे नव्हतें. रतन कांहीं नानूची कोणी नात्यापात्याचीहि नव्हती कीं जातीपातीचीहि नव्हती. पूर्वी कधींतरी रतनचे वडील कोंकणात नानूच्या शेजारी रहात असत तेव्हांची ओळख.

रतन होती म्युनिसिपालिटीच्या मराठी शाळेंत मास्तरीण. अर्थात् ती शाळेत गेली कीं, मग घरांत दुसरें कोणीच नसल्यामुळें नानूचा वेळ जातां जात नसे. खिडकीसमोर खुर्ची टाकून रस्त्यावरील रहदारी पाहण्यांत त्याचे तासचे तास जात.

दिवसेंदिवस मुंबईबद्दलच्या त्याच्या कल्पना खोट्या ठरूं लागल्या. कशा खोट्या ठरणार नाहींत ?

प्रत्यक्षावरून अप्रत्यक्षाच्या केलेल्या कल्पना कितीहि उदात्त असल्या तरी त्या खऱ्या ठरतातच असें कुठें आहे ! उलट खऱ्या ठरणें हा अपवाद नि खोट्या ठरणें हा नियम.

पूर्वी नानूला वाटे, मुंबईतले गरिबगुरिब श्रीमंतांच्या औदार्यामुळे जगत असतील ! पण अनुभव मात्र निराळाच आला ! बऱ्याच दिवसांच्या

निरीक्षणानें त्याला वाटूं लागलें कीं, मुंबईंत गरिबांच्या जिवावरच गरीब जगतो ! अगदीं खरा होता त्याचा अनुभव.

मुंबईंतले श्रीमंत लोक मोठमोठ्या बंगल्यांत नि ब्लॉकमध्ये राहतात. गोरगरीब कांहीं दाराची घंटा वाजवून भिक्षा मागायला जात नाहींत. आणि कोणी जाऊंही देणार नाही. भिकारी भिक्षा मागतात ती सर्वसाधारण–जवळजवळ गरिबांच्या चाळींतून ! मग गरिबच नाहीं का गरिबांचा अन्नदाता ?

* * * *

बरेच दिवस गेले.

' किती दिवस असा त्रास द्यायचा आपण रतनला ? परक्यांच्या चांगुलपणाचा फायदा घ्यायचा म्हटला तरी त्याला कांहीं सीमा आहे कीं नाही ! '

नानूचें मन नानूला बोचूं लागले. खाल्लेले अन्नहि त्यांच्या अंगाला लागेना. ' लाथ मारीन तिथं पाणी पाडीन ' ही मुंबईला यायच्या पूर्वीची धमक त्यांच्यात आतां राहिली नव्हती. स्वतःच्या भवितव्याविषयीं तो दिवसेंदिवस साशंक होऊं लागला.

शिवाय रतनकडे येणाऱ्या तिच्या इतर मैत्रिणी नानूकडे पाहून आपापसांत कुजबुजत नि फिदीफिदी हंसत. तेंहि नानूला दिवसेंदिवस असह्य होत होतें. रतनला नानूच्या खेडवळ साधेपणाचें–साधेपणा कसला तो–अजागळपणाच–कांहीं वाटत नसे. पण तिच्या शाळेंतल्या इतर मास्तरणी मात्र रतनकडे आल्या म्हणजे नानूची टर उडवायच्या ! तो ह्या सर्व चटकचांदण्यांच्या थट्टेचाच विषय होऊन बसला होता. त्या त्याला ' रानमाणूस ' म्हणायच्या.

आणि खरें म्हटलें तर त्याला कारण नानूचाच विक्षिप्तपणा ! एकादा

विषय निघाला कीं नानू असें कांहीं विचित्र बोले कीं, सर्वसाधारण माणसाला तें मुळीं कळतच नसे.

एकदां सूर्य कां उगवतो नि कां मावळतो याचे कारण सांगतांना नानूच्या कल्पना-भराऱ्या पाहून रतनच्या मैत्रिणी खो खो हंसूं लागल्या. तो म्हणाला—

" प्रत्यक्ष देवालासुद्धां जन्म माणसांनींच दिला. अशा अचाट कर्तृत्व-शक्तीचीं-देवाचा बाप होऊन बसलेलीं माणसं किती थोर असतील ! अशा माणसांनीं भरलेलं जग किती पवित्र असेल ?—अशा विचारांनीं सूर्य प्रथम डोंगराआडून जगाकडे डोकावून पाहूं लागला. प्रथम प्रथम त्याला सारं जग सोन्याहून पिवळं दिसलं. तो या जगाला भुलला नि कळ्या फुलवून त्यानं जगावर पुष्पवृष्टि केली. लोकांनीं त्याला सूर्योदय असं म्हटलं. पण पुढं त्याचा अनुभव खोटा ठरला. सगळं जग त्यानं पालथं घातलं. पण पुढं त्याची निराशा झाली. शेवटीं कंटाळून स्वतःच फुलवलेल्या नाजुक नाजुक फुलांचा चोळामोळा करून त्याच रक्तानं भरलेल्या हातांनीं तो पश्चिमेच्या मार्गानं निघून गेला. पश्चिमेला लाली दिसते ती त्याच रक्ताची ! लोक त्याला सूर्यास्त म्हणतात. 'आज तरी जग सुधारलं असेल का ?' अशा आशेनं सूर्य रोज जगांत येतो नि निराश होऊन रोज निघून जातो. ही त्याची अखंड ये जा चालू आहे. पण जग आहे तसंच आहे. बारा तासांपेक्षां जास्त वेळ राहाण्याइतकं जग कांहीं चांगलं नाहीं, असं त्याला वाटत असावं ! "

असली वटवट एकदां का नानूनें सुरू केली कीं मग त्या मास्तरणी त्याची पोटभर थट्टा करायच्या !

आणखी एकदां असेंच झालें.

त्या दिवशीं रतनच्या शाळेंतील मुली राणीचा बाग पहायला जाणार होत्या. रतननें नानूलाहि बरोबर घेतला. इतर मास्तरणी असणार

आणि उगीच आपली थट्टामस्करी होणार, हें नानूला माहीत होतें. आणि म्हणूनच त्यानें थोडेसे ओढेवेढे घेऊन पाहिले. पण रतनचा आग्रहच पडला नि नानूचा नाइलाज झाला. सगळ्या मुलीमास्तरणी मोर, कोकिळा बघण्यांत गर्क असायच्या, तर नानू मात्र आपल्या विचित्र स्वभावाला अनुसरून कोंबडा नि कावळा बघण्यांत गुतलेला असायचा! त्याची विलक्षण तऱ्हा पाहून इतर मास्तरणी एकमेकींशीं कुजबजत नि नानूकडे पाहून हळूच म्हणत, "या राणीच्या बागेंत सगळं कांहीं आहे. रानडुकर, रानमांजर, रानससा—सगळ आहे, पण राणमाणूस मात्र नाहीं. या नानूलाच जर का इथ ठेवून दिला, तर मात्र ही उणीव भरून निघेल."

त्यांच्या दृष्टीनें नानूच्या डोक्याचे स्क्रू ढिले झाले होते. आणि नानूच्या दृष्टीनें त्यांना मुळीं डोकेच नव्हतें!

त्या मास्तरणी मोर-कोकीळा बघत कौतुक करीत असतांना नानू मनांत म्हणे—

"बायकाना भेजा नसतो म्हणतात, तें कांहीं खोटं नव्हे! मोर आणि कोकिळा! काय या पक्ष्यांचा उपयोग? आणि कां म्हणून ह्या बायका त्या अज्ञानी मुलींप्रमाणच त्यांचं कौतुक करतात?

"त्यापेक्षा कावळा नि कोंबडा पहातील तर काय मौज होईल! कोंबडा—रोज मोठ्या पहांटेस आरवून झोंपा काढणाऱ्या जगाला साद घाल घालून उठवणारा प्राणी महत्त्वाचा नाहीं कां? जगाला जागवणाऱ्या कोंबड्याच कौतुक न करतां मोरासारख्या कुचकामी पक्ष्याचं कौतुक करणारं जग कृतघ्नच नव्हे का? उपकारकर्त्याला विसरून वरवरच्या भपक्याला भुलणारं जग मूर्ख खरं!

"आणि कावळा?—बिचाऱ्याचा आवाज कर्णकर्कश आहे खरा, पण त्यांत साऱ्या जगाचं सुख सांठवलेलं आहे. पण याची कदर कुणा-

लाच नसावी ना ? कोकिळेला कंठ असला तरी मनुष्यजातीचं कल्याण असं कितीसं झालं आहे त्यामुळं ! तीच कावळ्याची काव काव ऐका ! —अखिल सृष्टींतील संशोधनशक्ति त्या कावकावींत सामावलेली आहे. "का–का" किती अर्थपूर्ण ओरड ! आतांपर्यंतचे जगातले सारे शोध ह्या 'कां' नेंच लावलेले नाहींत का ? 'हें असं का नि तें तसं कां ?' या 'कां' च्या कटकटीमुळंच निरनिराळे शोध लागले नि मानवी जीवन इतकं सुखी झालं. संशोधकांचा हा आद्यगुरु कावळा बघावयाचा सोडून कोकिळा बघत बसणारं जग किती मूर्ख !"

घरीं परत आल्यावर त्यानें तसें त्या मास्तरणींना बिनदिक्कत बोलूनहि दाखवलें.

परत एकदां त्या सर्वांनीं त्याला "रानमाणूस" म्हटलें ! तो हिरमुसल्या-सारखाच झाला. त्याला वाईट वाटलें. पण त्यांना उलट बोलायला त्याला तोंड नव्हतें. कारण तो रतनच्या उपकाराच्या ओझ्याखालीं चिरडून गेला होता.

चिखलांत रुतलेल्या हत्तीला बघून बेडक्या 'टिंवटींव' करूं लागल्या तर बिचारा हत्ती काय करणार ?

एके दिवशीं—

वैतागाच्या भरांत, नानूनें रतनच्या नकळतच तिच्या घरातून पोबारा केला. असल्या जगांत राहाण्यापेक्षां जंगलांत जाऊन राहाणें बरें असा त्यानें निर्धार केला होता.

आणि खरोखरच तो जंगलात गेला.

बोरवलीच्या बाजूच्या आडरानांत, भिल्लांच्या झोपड्यांचा त्यानें आश्रय घेतला. श्रीमंत मामानें त्याला हांकलून लावला, पण अर्धनग्न अशा कंगाल भिकारी भिल्लांनीं त्याला आपलेपणा दाखवला !

भिल्ल ! स्पष्टच सांगायचे म्हणजे रानमाणसें तीं ! पण अनुभवानें तींच त्याला देवमाणसें वाटलीं !

जगांतल्या देवमाणसांनीं नानूला रानमाणूस ठरवून उपहास केला. पण रानांतल्या रानमाणसांनीं नानूला देवमाणूस ठरवला. कारण तिथें त्याच्या मदतीनें तो कोंबड्या पाळून राहूं लागला; तरी फावल्या वेळीं तो त्याना साक्षर करण्याचा प्रयत्न करी. स्वच्छता, टापटीप, काटकसर ह्या त्याना त्यापूर्वी अपरिचित असलेल्या गोष्टी नानूनेंच शिकवल्या होत्या. नानू भिल्लांची सेवा करी, भिल्ल नानूची सेवा—मोठ्या प्रेमानें सेवा करीत.

जगांतल्या देवमाणसांत राहण्यापेक्षां रानातल्या रानमाणसांत राहायला नानूला एक प्रकारचा आनंद नि अभिमान वाटू लागला.

पुढें पुढे तर त्यानें कोबडीं पाळण्याचा किफायतशीर धंदा मोठ्या प्रमाणांत सुरू केला नि त्याच धंद्यावर त्याने बराच पैसा मिळविला.

आज त्याच धंद्याला त्यानें 'कोंबडी संवर्धक संस्थे'चें स्वरूप आणलें असून लांबलांबचे लोक ती आदर्श संस्था पाहण्यासाठी येत असतात.

रतनहि त्याची जन्माची जोडीदारीण बनून तिथेच राहूं लागली. दोघेंहि सुखी झालीं.

दिवसें दिवस नानूच्या कर्तबगारीचें लोक कौतुक करूं लागले. त्याची भरभराट होऊं लागली. मामानें आपल्या श्रीमंतीच्या घमेंडीनें त्याला घराबाहेर काढला होता, पण आतां नानू तसल्या छप्पन् मामाना विकत घेऊं शकेल इतका गबर झाला होता.

म्हणूनच आतां कुठेंहि—कधींहि नानूचें नांव निघालें कीं, त्याचे मामा मोठ्या अभिमानानें सांगतात कीं, "नानू ना?—अहो तो माझा भाचा आहे!" आणखी कांहीं जवळचें नातें लावता आलें असतें तर तेंहि त्यांनीं लावलें असतें.

पण नानू प्रत्येकाला सांगत असतो कीं, 'जगांतला प्रत्येक श्रीमंत माणूस हा रानमाणूस आहे!'

# देवपूजा

कारकुनापासून त्यांची बढती होत होत मामलेदाराचा हुद्दा मिळाल्यामुळें भाऊसाहेबांचे अंगीं अधिकाऱ्याची मगरूरी किंवा सत्तेची धुंदी केव्हांहि कुणाला दिसत नसे.

विनय हेंच थोरामोठ्या सत्ताधाऱ्याचं खरं भूषण, हें भाऊसाहेब जाणून होते. आणि म्हणूनच त्याच्या बोलण्याचालण्यात एक प्रकारचा मार्दव असे. थोर दिलदार अंतःकरणाचे गृहस्थ म्हणून त्या तालुक्यांतच नव्हे तर साऱ्या जिल्ह्यांतहि त्यांचा बोलबाला होता. गोरगरिबांविषयीं ते नेहमींच सहानुभूति दाखवीत असत.

त्यांचं आयुष्य म्हणजे एकाद्या यंत्रासारखं होतं म्हटलं तरी त्यात कांहीं वावगं नाहीं. ठराविक वेळीं ठराविक गोष्टी अगदीं झाल्याच पाहिजेत, हा जुन्या लोकांचा अगदीं कटाक्ष असतो. त्याचप्रमाणें भाऊसाहेबांचा असायचा. सकाळी उठल्यापासून तो रात्रीं बिछान्यावर अंग टाकीपर्यंत सर्व दिनचर्या कशी अगदीं सुरळीत चालायची! उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा कांहीं असो, त्यांच्या त्या ठराविक कार्यक्रमांत कधींच फरक पडायचा नाहीं. मोठ्या पहांटेस उठून स्नानसंध्या, देवपूजा वगैरे होईपर्यंत नाहीं म्हटलें तरी सकाळचे नऊदहा तरी वाजायचेच!

भाऊसाहेबांची—कट्टर सनातनी वृत्तीच्या भाऊसाहेबांची देवपूजा म्हणजे कांहीं साधीसुधी गोष्ट नव्हे! भगवद्गितेचा पाठ, शिवाय इतर

ग्रंथांचा एकेक अध्याय वाचायलाच बराचसा वेळ मोडे ! शिवाय ते पडले उपासनीबुवांचे परमशिष्य ! अर्थात् गुरुमाऊलीनें दिलेल्या मंत्राच्या जपांत इतका वेळ जाई कीं, आसनमांडी सारखी तासन्तास घालून बसल्यामुळे त्यांच्या पायांला मुंग्या आल्यावांचून मुळींच रहात नसत.

भाऊसाहेबांची देवपूजेवर मात्र तशीच अनन्य निष्ठा असायची ! कितीहि महत्त्वाचीं कामें असोत, त्यांच्या देवपूजेत खंड पडलेला कुणालाहि कधींच दिसायचा नाहीं. तशीच त्यांची धार्मिक श्रद्धा होती. देवपूजा हेच माणसाचं खरं कर्तव्य, असेंच एखाद्याला त्यांच्या त्या पूजाव्रतावरून वाटायला हरकत नव्हती !

फार म्हटल्या फारच त्यांची श्रद्धा देवावर ! आणि दानधर्महि कांहीं कमी नव्हता ! आपल्या पगारांत घरप्रपंच चालवून थोडीतरी रक्कम दान-धर्मासाठीं खर्च करायची असा त्यांनीं निश्चयच केलेला होता. या सर्व गोष्टीमुळें व भाऊसाहेबांच्या निगर्वी आणि गोड स्वभावामुळें ते तालुक्यां-तील व खेड्यापाड्यांतील लोकांच्या लोकप्रियतेस पात्र झाले होते.

भाऊसाहेब मामलेदार म्हणजे अगदीं देवमाणूस हीच प्रत्येकाची भावना ! कारण मामलेदारसारख्या बड्या हुद्यावर असूनहि गोरगरिबां-विषयीं आदर दाखविणाऱ्या व्यक्ती फारच क्वचित् त्या लोकांना दिसत. आणि म्हणूनच भाऊसाहेब मामलेदारांना ते लोक अगदीं देवासारखे मानीत.

भाऊसाहेबहि त्या अशिक्षित खेडवळांच्या तक्रारी मोठ्या आस्थेनें ऐकून घेऊन न्यायनिष्ठूरतेनें व दरिद्री कंगाल अशा लोकांच्या अडी-अडचणी लक्षांत घेऊन न्यायनिवाडा करीत असत.

थोरांपासून लहानापर्यंत व श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत भाऊसाहेब सर्वांनाच सारखे आदरणीय वाटत. खेड्यांतील शेतकऱ्यांच्या तक्रारी

ऐकून घेण्यासाठीं ते आपल्या जेवणाखाणाचीही पर्वा करीत नसत. वाटेल त्या वेळीं वाटेल त्यांनीं भाऊसाहेबांची भेट घ्यावी व त्याच्यापुढें आपलीं गाऱ्हाणीं मांडून सल्ला घ्यावा हें प्रत्येकाला ठाऊक.

मात्र भाऊसाहेब मामलेदार सकाळच्या वेळीं कुणासच कधींहि भेटत नसत. कारण देवपूजा ! सकाळी सहा वाजतां पूजेस बसल्यानंतर मग त्यांची पूजा संपेपर्यंत कुणाचहि शहाणपण चालायचं नाहीं ! भाऊसाहेबांची पूजा सुरू झाली कीं बाहेरचीं माणसे तर सोडाच; पण खुद्द त्यांच्या कुटुंबांतील माणसांनीं सुद्धा हूं कीं चूं करायचं नाहीं, अशी सक्त ताकीद असायची त्याची !

देवपूजेच्या वेळीं लेंकरूंहि रडलेलें भाऊसाहेबांना खपत नसे. मुलांनाहि त्यांचा दरारा तसाच होता ! काय वाटेल तें झालं तरी देवपूजा आटोपेपर्यंत मध्येंच उठायचं नाहीं कुणाशीं बोलायचं नाहीं, व कुणाला मध्येंच भेटायचं नाहीं, हा त्याचा नेम असे.

पण—

एके दिवशीं मात्र अत्यंत चमत्कारिक प्रसंग आला. तो दिवस कसलातरी उत्सवाचा असावा. अर्थात् सर्वसाधारण दिवशीं देवपूजेंत इतके निमग्न असणारे मामलेदारसाहेब त्या दिवशी अधिकच व्रताधिष्ठानांत दंग असले तर काय नवल !

भाऊसाहेबानीं नुकतीच आपल्या बाळकृष्णाच्या सुवर्णमूर्तीला गंधाक्षता वहायला सुरवात केली होती. बाहेर ओटीवर कोणीतरी अगदीं गहिंवरून हातापाया पडत असल्याचें त्यांच्या कानीं पडलें. पण उठतां येईना ! कारण देवपूजा ! ! बाहेरचा माणूस मात्र तसाच बोलत होता.

* * *

तो एका जवळच्याच खेड्यांतील महार! आपली कांहीं तरी फिर्याद घेऊन मदत मागण्यासाठीं म्हणून आलेला. त्यानें भाऊसाहेबांच्या शिपायास विचारलें—

'हवालदारसाहेब, मामलेदारसाहेब कुठं आहेत?'

'कां, एवढ्या सकाळींच काय तुझं काम अडलं आज?'

'आधीं सांगा हो मामलेदारसाहेब कुठ आहेत तें मला!'

'त्यांची देवपूजा चालली आहे.'

'मग साहेब, त्यांना माझी गरीबाची फिर्याद कळवा हो. हात जोडतो तुम्हांला, तुमच्या पाया पडतो, पण आधीं माझी एवढी विनंति त्यांच्या कानावर घालून त्यांची गांठ घालून द्या हो. अगदीं जरूरीचं काम आहे. आत्तांच्या आत्तां भेटल पाहिजे त्यांना—'

'अरे म्हारड्या, सांगितलं ना एकदां कीं साहेब देवपूजेला बसले आहेत म्हणून? त्यांची देवपूजा आटोपली म्हणजे होईल भेट. तोपर्यंत बस तिथं बाहेर, नाहींतर ये जा जरा कुठंतरी फिरून.'

'कसलं आलंय फिरणं नि बिरणं अशा प्राण जायच्या वेळेला? साहेब, माझ्यावर कसंबी करून दया करा, आणि साहेबांना जरा बाहेर बोलावून आणा. उपकार होतील तुमचे गरिबावर. जन्मभर मी तुमचा आभारी राहीन. हें पहा डोकं ठेवतों तुमच्या पायांवर!'

धोंड्या महारानें पायांवर डोकें ठेवतों म्हणून लांबूनच जमिनीवर डोकें ठेवून नमस्कार केला व भळभळ रडूं लागला.

शिपाईहि थोडासा नरम आला. तसंच कांहींतरी अत्यंत निकडीचं काम असावं हें त्यानं ओळखलं. पण करणार काय! साहेबांची देवपूजा!

धोंड्या काकुळतीस येऊन शिपायाची विनवणी करीत होता. अगदीं

हातांपायां पडून पडून विनवीत होता. आणि शिपाई ठराविक उत्तरें देत होता.

धोंड्या महाराचा नाइलाज झाला. तिथंच आपलं फाटकं घोंगडं टाकून मामलेदारांची देवपूजा संपेपर्यंत त्याला बसणं भाग पडलं.

तो निराश होऊन देवाचा धांवा करीत आणि हजार देवांना आपल्यावर आलेलं संकट निवारण्यासाठीं नवस करीत घराच्या पायऱ्याशीं टेकून बसला. सबंध रात्रभर झोंप नसल्यामुळें त्याचे डोळे अगदीं लालबुंद व ताठरलेले असे दिसत होते. तशात चालण्याचा त्रास. बिचारा अगदीं जेरीस आलेला दिसत होता. बायकापोरांचं, गुराढोरांचं तिकडं काय झालं असेल? त्या दुष्टांनीं त्यांना मारून तर टाकलीं नसतील ना? वगैरे वगैरे भयंकर विचार त्याच्या डोक्यांत थैमान घालीत होते.

भाऊसाहेबांची देवपूजा संपली. ते बाहेर आले. धोंडूला परत भडभडून आलें. हुंदके फोडीतच त्यानें भाऊसाहेबाच्या पायांवर लावूनच मस्तक वाकविलें, आणि हात जोडून मामलेदारसाहेबांना सांगूं लागला—

'साहेब, मला वांचवा हो! आत्तांच्या आत्तां माझा आणि माझ्या बायकापोरांचा बचाव करा साहेब—'

'अरे काय झालं तेंतर सांग अगोदर. काय झालं?'

'नाहीं साहेब, आतां वेळ नाहीं सांगायला. माझ्या मदतीला शिपाई देऊन माझं रक्षण करा साहेब. मी तुमच्या पायां पडतों—नाक घांसतो.' धोंडू मोठमोठ्यानें रडूं लागला.

'हें पहा असा रडूं नकोस. काय झालं तें नीट समजल्याशिवाय मी शिपाई तुझ्या मदतीस कसे देऊं? सांग—काय झालं?'

'साहेब, कांहीं दिवसांपूर्वी माझ्या एका लहानग्या पोरानं एका नळाला

चुकून हात लावला. तेव्हां आजूबाजूच्या लोकांनीं त्याला मरेपर्यंत चोपून काढला. साहेब तो पोरगा अजून अंथरुणावर आहे–आणि त्या दिवसापासून साऱ्या गांवानं मला सळो कीं पळो करून सोडलं आहे. गांवांतल्या दुकानदारांनीं मला धान्य विकत द्यायचंहि बंद केलं आहे. गेल्या रात्रीं एकाएकीं मला ठार करण्यासाठीं म्हणून कांहीं लोक लाठ्या घेऊन आले आणि–हें पहा—'

असें म्हणत त्यानें आपल्या डाव्या हातावर बसलेला मार मुंडकें बाजूस करून भाऊसाहेबांस दाखविला. अत्यंत करुण मुद्रेनें धोंडू साहेबांकडे पहात होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या.

'अरे बापरे ! आणि हें तूं सहन करून बसलास कसा उगी ? चल त्या हॉस्पिटलांत अगोदर.' भाऊसाहेब त्याचा रक्तबंबाळ हात पाहून म्हणाले.

'साहेब–माझा हात राहूं दे. माझ्या बायकापोराना त्यांनीं रात्रीं ठार करण्याचा बेत केला होता हो–मी तसाच धांवत धांवत आपल्याकडे मदतीसाठीं आलों. पण आपण देवपूजेला बसलेले ! तिकडं काय झालं असेल याची मला कल्पनाच करतां येत नाहीं. एकेक क्षण मोलाचा आहे. जरा उशीर झाला तर–माझ्या पोरांचा चेंदामेंदा—'

धोंडू पुनः गहिंवरून बोलत होता. शेवटीं भाऊसाहेबांनीं कपडे केले, आणि शिपायांची एक तुकडी सोबत घेऊन येतों, असें आश्वासन देऊन धोंडूस पुढें पाठवून दिला.

धांवतपळत आपल्या गांवांत पोंचला. लपत छपत घराकडे गेला. पण—

तिथें त्याची छोटी झोंपडी नव्हती ! राखेचा भला थोरला ढीग पडलेला होता. त्याच आगीच्या डोंबांत बायकापोरं, आणि दोन गुरं जळून खाक झालीं होतीं.

धोंडू धाय मोकलून रडूं लागला. उर बडवून कपाळ जमिनीवर आदळूं लागला ! पण उपयोग काय ? व्हायचं होऊन चुकलं होतं. थोड्या वेळाने धोंडू उठला आणि छिन्नभिन्न स्थितीत पडलेल्या आपल्या बायकापोरांकडे पाहूं लागला.

आधींच बेदम मार पडून आजारी असलेला एक चार वर्षांचा पोरगा तसल्या त्या खाईत जळून मेलेला पाहून धोंडूच्या डोळ्यांपुढं काळोखी आली.

' जा–माझ्या वांसरा, जा ! काय तुझी स्थिति झाली असेल ? तूं कसा तडफडला असशील–अरेरे ! देवा, नाहीं कां रे आम्हां गरिबांचा वाली कोणी जगांत ? '

धोंडू मधून मधून तुटक तुटक असं आपल्याशींच बोलत होता. त्या लहान मुलाचं प्रेत घेऊन तो तसाच विव्हळत रडत होता. पाहाणाऱ्याचं काळीज चर्र झालं असतं, इतका भयंकर देखावा होता तो !

इतक्यांत—

कुठून तरी–' मारा–ठार करा त्याला ' अशा आरोळ्या ऐकूं आल्या धोंडूला. तो मागें वळून पहाणार तोंच आठ दहा लाठ्या थडाथड धोंडूच्या कपाळावर बसल्या. धोंडू रक्तबंबाळ होऊन जमिनीवर धाडकन् पडला.

मामलेदारसाहेब पोलिसांसह धोंडूच्या मदतीस आले.

धोंडू मूर्च्छा येऊन पडलेला त्यांना दिसला. सारं अंग रक्तानं माखलं होतं त्याचं. बाजूलाच लहान मुलाचं भाजलेलं प्रेत होतं. झोंपडी खाक झालेली होती. दोन गुरं मरून पडलीं होतीं. घराची मसनवट झाली होती. आजुबाजूस कोणीहि नव्हतं. सर्वत्र शुकशुकाट ! भयाण वातावरण दिसत होतं तिथलं. तो एकंदर भयंकर आणि हृदयद्रावक प्रकार पाहून मामलेदारसाहेबांच्याहि काळजांत धस्स झालं. त्यांच्या अंतःकरणाचं पाणीपाणी झालं.

एका शिपायानं धोंडूला पाणी पाजून शुद्धीवर आणला. त्यानें डोळे उघडले. क्षीण दृष्टीनें मामलेदारसाहेबांस पाहिलें. 'साहेब, आलां—! मी आपणांला उगीच त्रास दिला ! काय व्हायचा तो प्रकार आधींच झाला. मी आपल्या पायांकडे मदतीसाठीं धांव घेतली. पण आपण देव-पूजेला बसलेले ! आपण त्याच वेळीं आलां असतां तर—पण साहेब, आतां आटोपलं सगळं. माझी बायकापोरं आगींत भाजून—जिवंत भाजून तडफडून मेलीं हो !—आणि माझाहि आतांच कपाळमोक्ष झाला.—झालं ! त्यांच्या मनासारखं झालं ! साहेब, आपण देवपूजेंत वेळ न घालवितां ताबडतोब आलां असतां, तर माझा गरीबाचा मोडका तोडका संसार आणि शेंबडींलेंबडीं पोरं हयात राहिलीं असतीं. आपली पायधूळ मी त्यांना लावली असती ! आपल्या कृपेच्या आसऱ्यानं आम्हां चार पांच प्राण्यांना जीवदान मिळालं असतं ! पण साहेब आपली देवपू—जा—'

धोंडूचे शब्द खोल जात जात हळूहळू आवाज बंद झाला. त्यानें आपली जीवनयात्रा संपविली. त्यानें प्राण सोडला.

भाऊसाहेबांनीं रुमालानें आपले अश्रू पुसून काढले.

सर्वत्र शांतता पसरली. भाऊसाहेबांचं मन त्यांना छातीच्या धडधडत्या आवाजानं बजावूं लागलं— 'हा सारा अनर्थ देवपूजेनं केला. देवपूजा सोडून ताबडतोब मी निघालों असतों, तर ह्या प्राण्यांची आहुति पडली नसती. पांच देवांना वांचविण्याचं पुण्य मला लाभलं असतं. खरी देवपूजा साधली असती ! आणि मी देवपूजा केली—रोज करतों—पण पण छे ! हें देवपूजेचं पावित्र्यविडंबनच मी करतों आहें खास ! आजपासून प्राणिमात्राची सेवा हीच खरी देवपूजा मी करणार !'

भाऊसाहेबांच्या चेहऱ्यावर अनंत विचारलहरीचं प्रतिबिंब उमटत होतं. तशाच मनाच्या अस्थिर स्थितींत त्यांनीं चालायला सुरवात केली. फौजदारांमार्फत त्या अघोर, राक्षसी कृत्याची चौकशी चालविली—

पण त्यांना रोज सकाळीं देवपूजेची आठवण होते. धोंडू महाराचें व त्याच्या खाक झालेल्या दुबळ्या संसाराचें भयानक चित्र त्यांच्या डोळ्यांपुढं उभं रहातं. आणि अंतःकरणांतून—अगदीं आंतून आवाज निघतो कीं—हें देवपूजेचं पावित्र्य विडंबन !

# बोक्याची जात

" म्याँव !-म्याँव ! अगबाई—! बोका आला-! घेतेस घांस मुकाट्यानें,
कीं बोलावूं बोक्याला ? "

खिमट खातांना देखील बनू चुळबुळ करू लागली, कीं तिच्या आईनें तिला रोज बोक्याची भीति घालावी.

बोका !—घरादारांत वावरणारा, माणसाळलेला मवाळ प्राणी, मग त्याचीच कां तिनें बनूला भीति घालावी ?

प्रत्यक्ष भगवान बालकृष्णासारख्या बिलंदराला भिवविण्यासाठीं यशोदामातेनें निर्माण केलेला तो प्राणी—बागुलबोवा नव्हता का तिला ?

पण तिचेंहि बरोबरच !

स्वतःचीं पिलें स्वतःच खाणारा बोक्यासारखा क्रूर प्राणी निदान मातृहृदयाला तरी बागुलबोवापेक्षांहि भयंकर वाटतो. आणि म्हणूनच ती बनूला नेहमीं बोक्याचीच धमकी घालीत असावी, असें वाटतें.

बनूचें वय म्हणजे किती ? ती नुकतीच कुठें भिंतीला धरून उभी रहात होती. पण तेवढ्या चिमुकल्या वयांतच ती कित्येक सासऱ्यांची 'सून' झाली होती ! कित्येक 'पाळण्यांतल्या पतींची' पत्नि होऊन बसली होती—रोज होत होती !

रिकामपणाच्या वेळीं शेजारपाजारच्या साऱ्या साळकायामाळकाया एके ठिकाणीं जमल्या कीं, चुटकिसरशीं 'बोलाचाच भात आणि

बोलाचीच कढी ' करून, एकाद्या छकुल्या मुलाची अगर एखाद्या मुलीची, मोठ्या कौतुकानें मुहूर्तावांचून एका दिवसांत इतकीं लग्नें लावून देतील कीं, साऱ्या लग्नसराईंत मुंबईसारख्या शहरीं देखील सगळीं मिळून तितकीं होत नसतील ! अशींच बनूचींहि पण दिवसांतून शंभर लग्नें होत !

त्या लग्नांना जातीची, धर्माची कसलीहि आडकाठी नसते, कसलींहि बंधनें नसतात !

किती गोड दिवस ते आयुष्यांतले ! त्या वेळीं प्रौढ वयांतले सर्व सुखसोहाळे त्याबरोबरच्या जबाबदाऱ्यांखेरीज लहान मुलांना वडील माणसांच्या कृपाप्रसादाने प्राप्त होतात ! मोठीं माणसें मोठेपणाला कंटाळून ' धन्य तें बालपण देईं देवा फिरुनि ' असें म्हणून देवाला आळवीत असतात. पण त्यांनाच स्वतःला बाल्याच्या पवित्र वातावरणांत निर्विकारपणें वावरणाऱ्या बालबालिका कधीं एकदां मोठ्या झालेल्या पाहूं, असें होऊन जातें.

बनू कधीं मोठी होते, आणि कधीं तिचं लग्न होऊन जांवई आलेला पहाते, असें तिच्या आईला वाटे.

आपल्याला जांवई यावा अशी गोड हौस कुठल्या मुलीच्या आईला नसते म्हणा !

परंतु देवाच्या मनांतून तिची हौस पुरवायची नव्हती.

बनूचे सुखसोहळे पहायच्या अगोदरच ती या जगांतून निघून गेली.

तेव्हांपासून—

बनूच्या मामांनीं तिला आपल्याकडे—मुंबईला आणली.

तिथेंच ती लहानाची मोठी झाली. मॅट्रिकपर्यंत शिक्षणहि पण तिथेंच झालें. आणि बाळपणीं रोज शेंकडों जणांची पत्नि होऊन जाणारी बनू आतां कुठें लग्नाची झाली होती ! पण कुठेंच स्थळ जुळेना !

कारण— तिची पत्रिका पडली मंगळाची !

तिच्या पत्रिकेस जुळणारा एकादा मुलगा आढळलाच तर तो खुद्द मामानांच पसंत नसायचा !

वर्षानुवर्षें बनूच्या लग्नाच्या नुसत्या वाटाघाटीच चालत असत ! पण प्रत्यक्ष घटका कांहीं भरेनात !

बनूमात्र आपल्या पतीशीं कधी कधीं मूक संभाषण करीत असे !

पतीशीं ? तें कसें ? तिचें लग्न झालें होते का ?

छे—!

मग ती पतीशीं कशी बोलूं शकली ? पण त्यांत तरी एवढें आश्चर्य कसलें ?

लग्नापूर्वी स्वतःचा काल्पनिक पति निर्माण करून त्याच्याशीं मनसोक्त बोलीभाषण करायला, निदान मनोधर्माची तरी मुळींच ना नसते. कोणती तरुणी लग्नापूर्वीच स्वतःच्या पतीच्या काल्पनिक प्रतिमेशीं गुलगुल गोष्टी करीत नाहीं !

बनूच्याहि मनानें तेंच केले !

तिने मनानेंच एकादा प्रश्न विचारावा आणि परत काल्पनिक पतीची भूमिका घेऊन आपणांस पाहिजेत तशीं आपणच साधक बाधक उत्तरें द्यावींत.

जगाच्या दृष्टिआड खालील संभाषण बनूच्या मनोमंदिरांत रोज चाले.

'या लबाडाचा तोंडवळा थेट आपल्यासारखा दिसतो नाहीं ?'

'आणि डोळे ! तुझ्या आणि ह्याच्या डोळ्यांत थोडा तरी फरक दिसतो का ?'

'इश्य ! भारीच बाई बायकांच्या डोळ्यांवर पुरुषांचं लक्ष !'

'फार उशिरा लक्षांत आलें तुझ्या !'

अशा स्थितींत बनूच्या हृदयाला कसल्यातरी गुदगुल्या होत. आणि त्याच आनंदाच्या बेहोप स्थितींतून ती स्वप्नातून जागी झाल्यासारखी एकदम शुद्धीवर येई. तिचें मनोराज्य मनातल्या मनात मुरून जाई !

आपल्याला असें प्रत्यक्ष सुख कधीं मिळेल की नाहीं, याबद्दल दिवसें-दिवस ती साशंक होऊं लागली !

तिची बेचैन स्थिति होत असे.

शेजारच्या खोलीत मुलांबाळांत हंसून खेळून तिच्या जिवाला थोडासा काय तो विरंगुळा वाटायचा ! मामाना मूलबाळ कांहीं नसल्या-मुळें त्यांची खोली म्हणजे तिला अगदीं खायला आल्यासारखी वाटे. तितक्यात—शेजारचे बिऱ्हाडहि ती खोली खाली करून दुसरीकडे गेलें. बनूचा जीव अस्वस्थ झाला ! परंतु दुसऱ्या की तिसऱ्या दिवशींच त्या खोलीत एक तरुण रहायला आला. त्याने दारावर आपल्या नावाचा बोर्ड लावला. '**रामभाऊ बोके** ( कामत )'

हीं शुद्ध मराठी अक्षरें वाचून बनू बावरली !

बोके !

' अगबाई—! किती भयंकर हें नाव !' तिचे मन उद्गारलें.

' बोलवूं का बोक्याला ?' तिच्या आईच्या धमकीची तिला चटकन आठवण झाली. पण ती फार वेळ टिकली नाहीं. रामभाऊ बोके एका बँकेंत क्लार्क होता. त्याचा स्वभाव अत्यंत शांत आणि मनमिळाऊ असा होता.

हळुहळु—बनूची आणि रामभाऊची ओळख झाली !

ती आपल्या काल्पनिक पतीच्या प्रतिमेशीं त्याची प्रतिमा पडताळून पाहूं लागली.

काय असेल तें असो,-तिला त्यात कांहीच भेद दिसेना !

बनू आणि रामभाऊ आता अगदी मोकळेपणाने वागत असत. सिनेमा नाटकासहि जात असत !

घटका म्हणताना दिवस, आणि दिवस म्हणताना महिने, भराभर कधी निघून जात याची त्याना कल्पना नव्हती.

सुखाचा काल असाच जलद निघून जात असतो !

* * * *

योगायोग विलक्षण खरा !

बनूच्या मामानी हजार उंबरटे झिजविले —

शेकडो जोडे फाटले—

तेव्हा कुठे बनूच्या पत्रिकेस जुळणारा नवरामुलगा तिच्या ' मामा 'च्या पसंतीस आला !

झाले !

दिवस ठरला !

मुहूर्तहि मुक्रर करण्यात आला. आणि आतापर्यंत लग्न होत नसल्यामुळे चिंताक्रांत दिसणारी बनू आतां लग्न होणार म्हणून चिंतेत पडली !

ती कसल्यातरी गुप्त भीतीनें मनातल्या मनात झुरूं लागली. दोन चार दिवसांतच तिच्यांत पडूं नये इतका फरक पडला !

' बनूचें जेवणखाण का कमी झालं ? '

' ती अशी एकाएकी फिक्कट का दिसूं लागली ? '

बनूची मामी स्वतःच्या मनाला प्रश्न विचारूं लागली. परंतु रामभाऊनें बनूच्या मनावर घातलेल्या भुरळीनें निर्माण झालेलें कोडें बिचारी मामी कसें सोडविणार ?

* * * *

सध्याकाळचा वेळ होता,—रामभाऊ ऑफिसातून खोलीवर आला. नित्याप्रमाणे बनूहि त्याच्या खोलींत गेली.

रामभाऊच्या कानांत एकाएकी हुंदक्याचें स्फुंदन पडलें.

बनूच्या डोळ्यांतून भळभळ वाहाणारा अश्रुलोट पाहून रामभाऊ घाबरला.

' बनू ! काय झालं-? ' त्यानें तिला जवळ घेत विचारलें.

त्यावेळीं बनू एक अक्षरहि बोलायला असमर्थ होती.

' बनू, सांग तर खरं-काय झालं ? '

' मामांनीं लग्न ठरवलं ! ' तोंडावर पदराचा बोळा धरून तिनें जड आवाजांत अस्पष्ट उत्तर दिलें.

' मग ? '

' राम भा-ऊ- ! ! '

' काय ? '

' मी आतां काय हो करूं ? ' बनूनें रामभाऊच्या गळ्याला घट्ट मिठी मारली, आणि परत एक जोराचा हुंदका फोडला.

' तुझ्या मनांतून लग्न नाहीं का करायचं ? '

बनू उगीच राहिली. तिच्या अश्रूप्रवाहानें रामभाऊचा शर्ट भिजून चिंब झाला.

' बनू-अशी रडतेस कां ?—सांग ना ? शपथ आहे माझी ! '

' मला काहीं तरी देऊन ठार करा हो ! नको-नको आतां मला हा जन्म नको—! ! ' बनू काकुळतीला येऊन सांगूं लागली.

' असं झालं तरी काय ? शपथ घातली ना-बनू ? '

' मला चवथा......! ' तिनें परत रामभाऊंच्या गळ्याला मिठी मारून ओक्साबोक्सी रडायला सुरवात केली.

' आँ-!- '

रामभाऊच्या डोक्यात चक्क प्रकाश पडला ! त्यानें एक दीर्घ

सुस्कारा सोडला आणि हातांच्या पंजानें तोंड झांकून घेऊन खुर्चीवर अंग टाकलें.

एक क्षणभर रामभाऊच्या खोलींत संपूर्ण शांति पसरली होती.

पण दुसऱ्या क्षणांत—कसलासा विचार केल्यासारखें करून तो गंभीरपणें बनूस म्हणाला—

' एवढंच ना ? घाबरूं नकोस, उद्यां सांगेन काय तें. '

बनूला मात्र या शब्दांचा संबंध जुळवतां येईना.

' एवढंच ना ? ' ह्या शब्दाचें बनूला अत्यंत आश्चर्य वाटलें.

ही गोष्ट रामभाऊला ' एवढीशी ' कशी वाटली, याचा तिला उलगडा होईना.

थोड्या वेळानें तिनेंहि हिंग्या करून डोळे पुसले आणि नळावर तोंड धुऊन परत आपल्या कामाउद्योगाला लागली.

रामभाऊ उद्यां काय सांगणार ते ऐकण्यासाठी ती अधिर होऊन कधीं एकदां ' उद्यां ' उजाडतो याची वाट पाहूं लागली.

कशीबशी रात्र गेली !

काल्चा ' उद्यां ' आज उजाडला !

रामभाऊंनी ' सिक लिव्ह ' घेतली आणि ते औषध आणायला गेले. औषधाची बाटली घेऊन परत येतांना बनूनें त्याना पाहिलें.

' जिवाला बरं नाहीं का वाटत ? ' तिनें प्रश्न केला.

रामभाऊनें एक निश्वास सोडला !

रामभाऊंच्या विचित्र हालचालीकडे बनू आश्चर्यचकित होऊन भांबावलेल्या मुद्रेनें कावरीबावरी होऊन पाहूं लागली.

त्यानें एका ग्लासांत तें औषध ओतलें.

' हं-घे-! ' बनूकडे न बघतांच त्यानें तें तिच्या स्वाधीन केलें.

बनूनें ग्लास हातांत घेतलें.

ती सारें कांहीं समजून चुकली !

तिच्या रोमारोमांत वीज चमकल्यासारखें तिला वाटलें.

तिचे हात थरथर कापूं लागले, आणि तिच्या नकळत दोन अश्रुदाणे त्या ग्लासांत पटकन् पडले.

'घुट्ट !'

तिनें घुटका घेतला !

हातांतलें ग्लास खालीं पडून फुटलें आणि त्याचे तुकडे झाले. बनूच्या अंतःकरणाचेहि असेच तुकडे झाले असतील हें रामभाऊनें ओळखलें.

दुसऱ्या दिवशीं—झाडूवाल्याला एका गटारांत कागदाचे एक पुडकें सांपडलें. अर्धवट आणि अपूर्ण अवयवाचे एक मृत बालक होतें त्यांत !

त्यानें पोलिसांस वर्दी दिली.

चाळभर गवगवा झाला !

पोलीस येऊन त्या मृतपिंडाचा पंचनामा चालला होता.

समोरच्या खिडकीच्या झांकलेल्या दरवाजाच्या फटीतून बनू अश्रू ढाळीतच तो प्रकार पहात होती.

तिला एकदम धडकी भरली

तिचे अश्रू जागच्या जागीं थबकले

कां–?

त्या मृतबाळाची भेसूर स्थिति पाहून ती घाबरली का ?

मुळींच नाहीं

मग–?

पंचनाम्याच्या वेळीं साळसूद शिष्ट म्हणून प्रमुख पंच असलेल्या एका व्यक्तीस पाहून ती भ्याली.

स्वतःच्या पोराला मारणाऱ्या राक्षसाला—रामभाऊला पाहून तिची छाती फाटून गेली.

'बोक्याची जात—!' तिचें मन ओरडलें.

'बोलावूं का बोक्याला?' आईनें घातलेली धमकी तिच्या हृदयांत घुमूं लागली. मूर्च्छा येऊन ती धाडकन् कोसळली.

आतां—रोज रात्री बारा वाजतां 'स्वतःची पिलं खाणारा बोका!' असा भेसूर ध्वनि रामभाऊच्या कानांत पडतो आणि तो दचकून उठतो!

# न घडलेली गोष्ट

गोष्ट लिहायची होती, म्हणून मी कसलाच विचार न करतां कागद नि पेन घेऊन लिहायला बसलों.

" कसली गोष्ट लिहूं ? " मनाला प्रश्न पडला.

खूप विचार केला, पण विषयच सूचेना. कसलंच कथानक आठवेना.

" पुरुरव्याला सोडून उर्वशी एकाएकीं निघून गेली, तशी माझी प्रतिभा मला अकालींच सोडून गेली नाहीं ना ? " मला शंका आली. पुन्हा मनाला वाटलं— " गोष्ट लिहायचीच आहे म्हणून विषय शोधायचा असतो कीं, विषय सुचला म्हणजे गोष्ट लिहायची असते ? "

पण या प्रश्नामुळं माझं मलाच हंसूं आलं ! कारण " खाण्यासाठीं जगायचं कीं जगण्यासाठीं खायचं ? " या प्रश्नाइतकाच तो प्रश्न अव्यवहार्य होता.

शेवटीं कांहींच सुचत नाहीं असं पाहून मी लिहिण्याचं सगळं साहित्य ठेवून दिलं नि रोजच्या नियमाप्रमाणं झोंपण्यापूर्वी आरशांत तोंड पाहाण्यासाठीं म्हणून आरसा हातांत घेतला.

त्या आरशांत पाठीमागच्या भिंतीवर लटकत असलेल्या रविंद्रनाथ टागोरांच्या तसबिरीचं प्रतिबिंब दिसलं मला. मी मागं वळून तसबिरीकडे पाहिलं— त्या तसबिरीवर कितीतरी धूळ दिसली.

" काय खुळा मी ! आरसा रोज पुसतों. पण तसबीर मात्र महिनेच्या

महिने पुसत नाहीं" मी स्वतःला दोष देत स्वतःशींच पुटपुटलों. आरसा जिथल्या तिथं ठेवून आधीं तसबीर साफ केली.

आरशाकडे एकदां पाहिलं— तसबिरीकडेहि तसंच एकदा पाहिलं. परत एकदां आरसा न्याहाळला नि आणखी एकदां तसबिरीकडे टक लावून पाहूं लागलों.

आरसा नि तसबीर !

दोन भांवडं पण किती अंतर त्या दोघांमधें ! असे अनेक विचार आले माझ्या मनांत— आणि विचार करतां करतां कधीं झोंपलों तें माझं मलाच समजलं नाहीं.

* * * *

"दादा !" तसबिरीनं आरशाला हांक मारली.

"काय ताई ?" निश्चल नजरेनं तसबिरीकडे पहात आरसा म्हणाला.

"दादा, किती रे भाग्यवान तूं ? तुझं भाग्य माझ्या नशिबीं नाहीं का ? अशीच कां मी कुठं तरी कोनाकोपऱ्यांत लटकत राहणार !" असं बोलत असतांनाच तसबिरीच्या डोळ्यांत चटकन् पाणी आलं. बहीण कष्टी झालेली पाहून भावाचं अंतःकरण हालल्यावांचून राहिलं नाहीं.

"कसलं माझं भाग्य ताई ! काय म्हणतेस तूं !" आरशानं लगबगीनं विचारलं.

"कसलं भाग्य ? वाः ! थट्टा करतोस होय माझी ?"

"नाहीं ताई, थट्टा नाहीं— खरंच विचारतों मी, कसलं माझं भाग्य ?"

"कसलं म्हणजे ?—सगळं जग तुझं कित्ती कित्ती कौतुक करतं ! तू तुझ्या गुणांनीं लहान थोरांना अगदीं मोहून टाकून सगळ्यांचा लाडका होऊन बसला आहेस. पण मी ? माझ्याकडे कुणाचं लक्ष असेल तर शपथ ! कुठं तूं—नि कुठं मी !"

" ह्यात्तिच्या ! हेंच माझं भाग्य? वेडी कुठली ! " आरसा मोठमोठ्यानं हंसूं लागला.

" कां हंसतोस दादा !" तसबिरीनं त्याला विचारलं.

" ताई खरं सांगूं का ? तूं अगदींच भोळसर आहेस बघ. "

" म्हणजे ? "

" अग वेडे, हें माझें भाग्य नाहीं.—दुर्भाग्य आहे."आरसा म्हणाला.

" इश्य !—दुर्भाग्य ! कांहींतरीच काय रे बोलतोस असं ? "

" कांहींतरीच नाहीं ताई, अगदीं खरं बोललों मी."

" कसं ! "

" हें पहा, तूं ज्याला भाग्य म्हणतेस, तें माझ्या दृष्टीनं दुर्भाग्य आहे. अग वेडे, मी इतका जगाचा लाडका कसा झालों हें ठाऊक आहे का तुला ? "

" अं—हं !" तसबिरीनं मान हालवीत उत्तर दिलं.

" ऐक—" आरशानं सांगायला सुरवात केली.

" तुझ्यांत नि माझ्यांत फार महत्त्वाचं अंतर आहे. माणसाची ध्येय-निष्ठा तुझ्या अंगीं बाणलेली आहे, तर मी–लांगूनचालन करणारा एक लाचार होऊन जगतों आहे. "

" लाचार ? आणि तो कसा काय ?" तिनं प्रश्न केला.

" पहा, जो माझ्यासमोर येतो, त्याचा मी होऊन जातों. मला माझं स्वतःचं असं कांहींच नाहीं. पोटासाठीं वारा येईल तशी पाठ फिरविणारा एखादा ध्येयशून्य माणूस नि मी सारखाच ! भेटेल त्याच्यासारखं होणं, मिळेल त्याच्याशीं मिसळून एक जीव बनणं, एकदां ह्याच्यासारखा, तर एकदां त्याच्यासारखा–ही माझी पोटभरू वृत्ति आणि ह्याच माझ्या गुणा-मुळं लोकांना मी आवडतों. जगांत सुखानं जगण्याची इच्छा असणाऱ्याला

असंच वागावं लागतं. व्यवहारी जगांत जगण्याची कला आहे ही! मला स्वत्व नाहीं.—सुखासाठीं—लोकप्रियतेसाठीं जसा बनवावा तसा बनतो मी! आणि यालाच तूं भाग्य म्हणतेस का?"

"भाग्य नव्हे तर काय हें?"

इतकं सांगूनसुद्धां तसबिरीच्या डोक्यांत प्रकाश पडला नाहीं, हें पाहून आरसा पुन्हां तिला समजावून सांगण्यासाठीं म्हणाला—

"हें भाग्य नव्हे,—भाग्याचा नुसता आभास—भाग्याचं विडंबन! खरी भाग्यवान जर कोण असेल, तर ती तूं!"

आपल्याला भाग्यवान ठरविणाऱ्या आरशाचं तिला आश्चर्य वाटलं. तिनं विचारलं—

"मी कशी भाग्यवान? एखाद्या कोनाकोपऱ्यांत कसं तरी आयुष्य कंठणं, हें का भाग्याचं लक्षण? तूं आणि मी—आम्ही आवळीजुवळीं भावंडं. पण तूं दगडाच्या एका तुकड्याप्रमाणं देव होऊन बसलास, तर मी दुसऱ्या तुकड्याप्रमाणं पायरी होऊन पडलें आहें. देवाकडे जाणारा प्रथम पायरीवर पाय ठेवून जातो नाहीं का? तसंच—अगदीं तसंच तुझं माझं आहे. उठल्या सुटल्या तुझंच कोडकौतुक करणाऱ्या जगाला माझ्याकडे लक्ष द्यायला वेळसुद्धां मिळत नाहीं. खरं सांगायचं म्हणजे तुझ्या माझ्यांत देवा-दगडाइतकं अंतर आहे."

"—पण देवळाला देवाची नि पायरीची सारखीच आवश्यकता असते. हें विसरलीस तूं ताई? आणि म्हणूनच उपयुक्ततेच्या बाबतींत तूं नि मी—आपण आपापल्यापरी सारखींच महत्त्वाचीं आहोंत. तुझ्या दृष्टीनं मी भाग्यवान नि माझ्या मताप्रमाणं तूं भाग्यवान! असलेल्याचं महत्त्व नसणं नि नसलेलं महत्त्वाचं वाटणं हा मानवी स्वभावधर्मच आहे नाहीं?"

आरसा सारखा बोलत होता, तसबीर निमूटपणें ऐकत होती.

" ताई, तुला तुझं स्वत्व आहे. क्षणाक्षणाला रंग बदलण्याची मतलबी दुनियेची कला तुझ्या सरळ नि सालस स्वभावाला पटणार नाहीं. तुझं स्वरूप, तुझीं मतं, कायम आहेत. तर मी 'पाणी तेरा रंग कैसा? जिसमें मिलावे वैसा!' अशा वृत्तीचा आहें. 'वांकेन पण जगेन' हें माझं ब्रीदवाक्य! तर 'मोडेन पण वांकणार नाही' हें तुझं ब्रीदवाक्य! आणि ताई, चार भिंतीच्या मर्यादेंत का असेना, पण तुला निश्चित असं स्थान आहे. आणि मला? सगळं जग मला मोकळं असलं, तरी मला कुठं हक्काचं स्थळ आहे का? स्थानभ्रष्ट गडगडत्या दगडापेक्षां, खब-दाडींतली का होईना, पण शीळा होणं अधिक बरं नाहीं का? ताई, तुझा जन्म मला लाभला असता, तर ध्येयनिष्ठ माणसाला करावा लागणारा स्वार्थत्याग नि सोसावे लागणारे कष्ट मी मोठ्या आनंदानं सहन केले असते! पुढचा जन्म मागेन तेव्हां तसबिरीचा मागेन!

तसबिरीला तें पटलं. तिला आपल्या जन्माबद्दल धन्यता वाटली.

" खरंच दादा, मला माझ्या जन्माची ओळख पटली. आत्मनिरीक्षण करण्याची संवय नसलेल्या माणसाची अशीच फसगत होते. खरंच दादा, तूं कित्ती कित्ती रे शहाणा—!"

* * * *

आरशाजवळ जाण्यासाठीं म्हणून ती पुढं झाली, आणि—

" खळ्ळ!"

टागोरांची तसबीर दोरी तुटल्यामुळें खालीं पडली, नि त्या आवाजानें मी एकदम दचकून जागा झालों.

स्वप्न अपुरें राहिलें! आणखी किती वेळ मी त्या स्वप्नांत गुंग झालों असतों कोण जाणे!

न घडलेली गोष्ट घडली—स्वप्नांत घडली!

किती गोड स्वप्न तें! अशीं स्वप्नें रोज रोज पडतील तर किती गंमत होईल!

दोन मनांचा–दोन मतांचा परस्पर विरोधी झगडा चालला होता तो! मानवी स्वभावांतील स्वाभाविक प्रवृत्ती त्यांच्या संवादांत प्रामुख्यानें प्रतीत होत होती.

'असं स्वप्न मला कां बरं पडावं? यांत माझी भूमिका कोणती? मी तसबीर कीं आरसा?—कीं कोणीच नव्हे?'

असा कितीतरी विचार केला मी मनाशीं. पण माझें मन मला उत्तर देईना. तसबीर नि आरसा यांच्या तात्विक चर्चेंत माझें मन अगदीं गर्क होऊन गेलें होतें. अगदीं स्तब्ध राहिलें होतें.

आरशाच्या बोलण्यांतील तात्विकता मला पटली, तशी तसबिरीच्या बोलण्यांतील स्वाभाविकताहि मला खरी वाटली. आणि म्हणूनच माझें मन एकदां आरशाकडे तर एकदां तसबिरीकडे हेलकावे घेऊं लागलें. पण नक्की निकाल कांहींच ठरेना.

आरसा नि तसबीर!!

मी आरशाकडे नि तसबिरीकडे अर्थपूर्ण नजरेनें एकदां पाहिलें—नि झालेला वृत्तांत लिहून काढला.

पहातों तों गोष्ट तयार!

नांव दिलें "न घडलेली गोष्ट!"

ही न घडलेली गोष्ट पाहून मला मात्र एक प्रश्न पडतो कीं, मी तसबीर होऊं का आरसा?

---

६

# साळुंकीची शीळ

किर्र असं भलं थोरलं एक अरण्य होतं. गगनचुंबी वृक्षाच्या अवाढव्य विस्तारामुळें सूर्यकिरणांची वाट अजिबात बंद झाली होती. हिंस्र पशूंच्या भेसूर किंकाळ्यांचा प्रतिध्वनि दाही दिशा दुमदुमून सोडीत होता. बालमंदाकिनीच्या खेळकर वृत्तीचा खुळुखुळु आवाज कुठें तरी खोल खबदाडींत ऐकू येत होता. तेथेंच एका भव्य वृक्षावर साळुंकीचें लहानसें घरटें होतें.

सूर्यनारायण दमूनभागून गेल्यामुळें विश्रांतीसाठीं पाताळांत पाय टाकीत होते. सबंध दिवस जीवनकलहाशीं टक्कर देणारी साळुंकीसुद्धां शांतिसुखासाठीं आपल्या मठींत येऊन आपल्या लाडक्या पिलांना पंखांत घेऊन बसली होती. तिचें वात्सल्यप्रेमानें ओथंबून आलेलें हृदय तिच्या तोंडून सुरेल ताना काढीत होतें.

जवळच्याच पानावर एक सुरवंट अस्ताव्यस्त लोळत पडला होता.

ती मोठ्या कौतुकानें त्याच्याकडे पाहूं लागली. तिला हंसें आवरेना !

त्या कुत्सित हास्याचा फिदी फिदी आवाज सुरवंटाच्या कानांत पडला !

त्यानें वळून पाहिलें !

'किती क्षुद्र प्राणी हा !' साळुंकी हळूंच म्हणाली.

तेहि उद्गार सुरवंटाच्या कानीं आदळलेच. सुरवंट पोटभर हंसला.

साळुंकी परत हंसली.

दोघांच्याहि हास्यांचीं कारणें भिन्न होतीं. पण एकाच्या हास्याचें कारण दुसऱ्यास ठाऊक नव्हतें.

‘ ताई, कां ग हंसतेस ? ’ सुरवंटानें अगदीं घरगुति नात्यानं तिला विचारलें.

‘ आणखी कशाला हंसणार ! किती क्षुद्र हा देह तुझा ! काय तुझ्या जन्माचें सार्थक होणार ? ’

सुरवंट पुन्हां हंसला.

‘ माझं देहलावण्य तर सोडच पण स्वरमाधुर्यसुद्धां साऱ्या जगाला मोहून टाकील ! ’ साळुंकीनं परत बोलायला सुरवात केलेलें वाक्य संपवून ती मोठया गर्वानें व दिमाखानें सुरवंटाकडे पहात अगदीं ऐटींत टेकून बसली.

सुरवंट सस्मित चेहरा करून म्हणाला—

‘ वेडी आहेस ताई तूं—!’

‘ मी वेडी ! आणि ती कशी ? ’ सुरवंटाला मध्येंच थांबवून साळुंकी म्हणाली.

‘ सांगतों ऐक—’ सुरवंटानें बोलायला सुरवात केली. ‘ हें पहा, तूं स्वतःला शहाणी समजतेस एवढंच. अग, आज ज्याची एवढी बडेजावी तूं मारतेस, त्यामुळेंच उद्यां तुला बंदीशाळेंत बसावें लागेल, समजलीस ? मी दिसायला अगदीं लहान–अगदीं क्षुद्र ! पण आजचा एक क्षुद्र प्राणी उद्यांचा एक तत्त्ववेत्ता होणार आहे समजलीस ? ’

‘ काय बोलतोस हें ? अरे हा नुसता पोकळ आशावाद झाला. ’

‘ तुला वेडी म्हणतों त्याचें कारण हेंच. अग, इतकेंहि तुला कळूं नये ! सबंध जगाच्या जीवनवृत्तीच्या मुळाशींच आशावाद आधारभूत आहे. आशा आणि जीवन एकमेकांपासून अलग करतांच येणार नाहीं.’

'मला नको हीं तुझीं तत्त्वज्ञानें. तत्त्वज्ञान म्हणजे रिकाम्या डोक्याला कधीं न संपणारें असें काम आहे झालें. पुढें अमुक होणार नी तमुक होणार ह्या 'होणार'च्या जाहिराती वाचून लभ्यांश काय? आज काय आहे त्याचा विचार करायचा अगोदर.' साळुंकीनें सुरवंटाला अगदीं चीत करण्याच्या उद्देशानें, पण मारे झणकाऱ्यानें उत्तर दिलें.

सुरवंटाला तिची कशी समजूत करावी हें कळेनाच कांहीं वेळ. तो जरासा स्तब्ध राहून म्हणाला—

'अग ताई, पुढच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन आजपासून वागणं हेंच धोरण मोठमोठ्या धूरीणांना त्यांच्या कष्टमय परिस्थितींतून मार्ग काढायला उपयोगी पडतं. नुसता आजचा विचार करणें म्हणजे स्वैराचाऱ्याचा पथ स्वीकारून 'खाना पिना मजा करना' या बेफिकिरी वृत्तीचा अवलंब करणें आहे. तुला कसे वाटतें?'

साळुंकी तोंड वासून ऐकतच राहिली. तिला काय बोलावें हेच सुचेना.

'आतां उगी कां?' सुरवंट म्हणाला. 'हें पहा, आज तूं स्वतंत्र वातावरणांत उड्डाण करतेस पण लक्षांत ठेव कीं, स्वातंत्र्याच्या सीमेचें उल्लंघन झालें कीं पारतंत्र्याचें कुंपण आपोआपच भोंवती दिसूं लागतें. यासाठीं मी म्हणतों, नव्हे विनंती करतों कीं, काय वाटेल तें कर पण परमेश्वरानें तुला दिलेल्या ह्या स्वातंत्र्याचें रक्षण कर. नुसतें स्वातंत्र्य मिळालें म्हणून झालें नाहीं, तर तें कायम राखण्यातच मोठी मार्मिकता आहे.'

'अरे! पण मला कां एवढा उपदेश करतोस? तूं स्वतः हतबल आहेस, म्हणून माझें हें वैभव तुझ्या डोळ्यांत खुपतें आहे वाटतें!' साळुंकीनें जरा रागानें विचारलें.

'नाहीं ताई! मी दिसायला लहान असलों तरी वयानें मोठा आहें हें विसरूं नको.

'तुझ्या स्वातंत्र्यवैभवाचा हेवा करण्याइतका मी हीन वृत्तीचा नाहीं. तुझ्याप्रमाणें मीहि स्वातंत्र्यप्रेमी आहें. आणि त्यासाठीं अहोरात्र मी खटपट करतों आहें.'

सुरवंटाचे हे शब्द ऐकून साळुंकीला आश्चर्यच वाटलें. ती मनांत म्हणाली कीं, 'हा सुरवंट काय, आणि स्वातंत्र्य मिळविणार काय!' तिला तो अगदीं कनिष्ठ वाटत होता. आपण काय ती मोठी, असा तिला गर्व होता. पुढें त्याच प्रश्नावर भवति न भवति होऊन बोलतां बोलतां रात्र संपली. बालरवीचे बालकिरण जिकडे तिकडे खेळूं लागले. रोजच्याप्रमाणें साळुंकी पोटासाठीं निघून गेली. सुरवंटहि आपल्या उद्योगास लागला.

बरेच दिवस लोटले.

× × × ×

साळुंकीला फांसेपारध्यानें पकडून बाजारांत विकावयास नेलें. एका काळच्या स्वतंत्र राणीचें राणी तारामतीप्रमाणें भरबाजारांत लिलांव झालें. एका हौशी श्रीमंतानें तिला विकत घेतली. फार श्रमपूर्वक तयार केलेलें मोडकें तोडकें पण आवडीचें घरटें तिला पारखें झालें. पिंजरारुपी सोन्याचा तुरुंग तिच्या नशिबीं आला. चार दिवस तिला त्या पिंजऱ्यांत चैन पडेना. काटक्या कुटक्यांचा तिचा तो छोटा राजवाडा अष्टौप्रहर तिच्या डोळ्यांसमोर येऊं लागला. खाण्यापिण्याकडे तिचें मुळींच लक्ष लागेना. पण असें किती दिवस चालणार?

जसजसा काळ लोटत होता, तसतसा तिच्या दुःखाचा कढ कमी होत होता. हळुहळू पूर्व वैभवाचें तिला विस्मरण झालें. पहिल्या पहिल्यानें जी पिंजऱ्याबाहेर पडायला प्राण घालवीत होती, तीच आतां

बाहेर सोडली तरी प्राणरक्षणार्थ पिंजऱ्यांतच येऊन बसूं लागली! तिच्या अंगीं पारतंत्र्य पूर्णपणें मुरल्यामुळें तेंच तिला स्वातंत्र्यसुखासारखें वाटूं लागलें.

एके दिवशीं दुपारीं—

डाळिंब-दाणे खाऊन आणि थोडेसें पाणी पिऊन धन्यानें शिकवलेला पाठ घोकीत ती बसली होती. इतक्यांत एक रंगीबेरंगी फुलपाखरूं भटकत भटकत तिथें आलें. साळुंकीची सुरेल शीळ ऐकून त्या फुलपाखरास तो आवाज ओळखीचा वाटला. त्यानें पिंजऱ्यांत वांकून पाहिलें.

त्याला साळुंकी दिसली!

फुलपाखरानें साळुंकीस ओळखलें.

साळुंकीला मात्र फुलपाखराची ओळख नव्हती. कशी असेल! एके काळचा सूक्ष्म सुरवंट आज अशा स्वरूपांत आनंदानें बागडत असेल हें तिच्या ध्यानींमनींहि नव्हतें.

सुरवंटाला मात्र साळुंकी पिंजऱ्यांत पडलेली पाहून मनस्वी वाईट वाटलें.

लगेच त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले व कंठ भरून आला.

'ताई!' त्यानें जड आवाजांत साळुंकीस हांक मारली.

'ओ!' साळुंकीनें श्रीमंतीच्या तोऱ्यांतच फुलपांखराकडे पहात म्हटलें.

'काय ही तुझी स्थिति?'

'कोण आपण?' साळुंकीनें आश्चर्यानें प्रश्न केला, आणि उत्तराची वाट पाहूं लागली.

'अजून नाहीं का माझी ओळख पटली?'

'नाहीं!'

' मी सुरवंट ! '

' काय ? सुरवंट ? ' ती ' आ ' वासून त्याच्याकडे पहातच राहिली.

' तुला आश्चर्य कसलें वाटलें ? '

' त्या वेळीं तूं कसा होतास आणि आज कसा आहेस ! एवढें वैभव तुला कसें प्राप्त झालें ? ' तिनें विचारलें.

' प्राप्त झालें नाहीं, प्राप्त करून घेतलें. बऱ्याच दिवसांच्या कष्टाचें हें चीज आहे. मलासुद्धां स्वातंत्र्य मिळवायला कोषाच्या कोठडींत कित्येक दिवस कोंडून रहावें लागलें. कारावासासारख्या अनंत आपत्ती सोसून मोठ्या सायसानीं मिळविलेलं स्वातंत्र्य आहे हें. चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे ! '

त्यानें आपल्या स्थित्यंतराची साद्यंत हकीकत तिला समजावून दिली.

तिनें एक सुस्वर शीळ घातली.

पूर्व स्वातंत्र्याचीं स्मृतिचित्रें तिच्या मनःचक्षूंपुढें दिसूं लागलीं.

शेटीं फुलपाखरानें जड आवाजांत आणि भरल्या डोळ्यांनीं साळुंकीचा निरोपघेण्यासाठीं म्हटलें—

'ताई, जातों हं मी. '

साळुंकीच्याहि डोळ्यांत त्यावेळीं पाणी तरारलें. तिनेंहि एक खोल आवाजाची शीळ घातली.

त्या शीळेच्या आवाजांतून तिला सांगावयाचें होतें कीं,—

' जा ! दूर—दूर जा. आणि साऱ्या जगाला माझा—ह्या हतभागी साळूंकीचा एकच संदेश सांग कीं, स्वातंत्र्य मिळवणं जितकं कठीण असतं त्यापेक्षां तें टिकवणं फारच कठीण असतं ! मी पातकी आहें.

माझ्या स्वातंत्र्याच्या धुंदीनेंच माझी ही केविलवाणी दशा झाली. मला आतां हा कारावास आजन्म भोगलाच पाहिजे.'

सुरवंट ऊर्फ तें फुलपांखरू खेळत खेळत जाऊं लागलें.

साळुंकीच्या अश्रूपूर्ण नजरेला तें शेवटीं दिसेनासें झालें!

ती आपल्या मंजूळ शीळीनें रोज सुरवंटाला हांक मारते. पण सुरवंट कधींच परत आला नाहीं.

# चमत्कार !

अनेकांच्या अनेक आवडी असतात, पण विचार करीत बसणें ही अरुणची तऱ्हेवाईक आवड होती. अविनाशला ठाऊक नव्हतें असें नव्हे. पण अरुणच्या मुद्रेवरील त्यावेळची खिन्नता मात्र त्यापूर्वी त्याला कधींच दिसली नव्हती.

अरुणची त्यावेळची चर्या पाहून अविनाशला आश्चर्य वाटलें. आल्या पावलांनी परत जावें, बसूं दे त्याला तसा विचार करीत, असेहि त्याचें मन म्हणूं लागलें. पण दुसरें मन म्हणालें,—काय भानगड आहे कोण जाणे ! उलगडा घ्यावाच करून. कांहीं बरं वाईट असलं तर !

"अरुण, असा उदास कां दिसतोस तूं आज? काय झालं?" खुर्ची घेऊन अरुणच्या जवळ बसतां बसता अविनाशनें विचारलें.

"जगाचा कंटाळा आलाय मला." कपाळाला आंठ्या घालून अरुणनें उत्तर दिलें. अविनाश मोठमोठ्यानें हंसत सुटला. त्यानें ओळखलें कीं, स्वारी आपल्या नेहमींच्या सवईप्रमाणेंच वैतागलेली होती. आगींत तेल ओतण्यासाठीं म्हणूनच अविनाश अरुणला म्हणाला,—

"अस्सं अस्सं ! कांही माणसं निष्कारण विचार करण्यांत आपलं अर्ध आयुष्य फुकट घालवतात; त्यापैकीं तूं एक फुकट फौजदार आहेस झालं !"

"खरं आहे तुझं म्हणणं." अरुण उद्गारला. "तुला नाहीं कळायचं तें !"

"काय नाहीं कळायचं मला अरुण !"

"माझी तळमळ !"

परत अविनाश हंसला. आणि हंसत हंसतच तो म्हणाला, "आहे ठाऊक मला तुझी तळमळ. आपल्या म्हणण्याप्रमाणं जगांतले सर्व व्यवहार घडले पाहिजेत, असं तुझ्याप्रमाणं प्रत्येकजण म्हणूं लागला. तर मोठा अनर्थच ओढवेल !"

अविनाश बोलत होता, तरी अरुण आपल्या विचारतंद्रींतच गर्क होता. कॅलेंडरवरची तारीखसुद्धां त्यानें बदलली नव्हती. तें काम अविनाशनें केलें. बराच वेळपर्यंत अरुण कांहींच बोलेना, म्हणून मुद्दाम त्याला डिवचण्यासाठीं म्हणून अविनाश म्हणाला, "जग हें असें आहे, म्हणूनच जगण्यांत मौज आहे."

"मूर्ख आहेस तूं ! असल्या जगांत जगायला तुला मौज वाटते, पण मला शरम वाटते. यापेक्षां अधिक चांगल्या जगांत आपण जगावं—"

"म्हणजे ? हें जग चांगलं नाहीं, असं तुला म्हणायचं आहे कीं काय !" अरुणचें बोलणें पुरें होण्यापूर्वींच अविनाशनें प्रश्न केला.

"अर्थात् !" अरुणनें उत्तर दिलें, "अविनाश, कधीं काळीं सुधारेल का रे हें जग ?"

"कां नाहीं सुधारणार ? कालच्यापेक्षां आज सुधारलं, आजच्यापेक्षां उद्यां सुधारेल ! पण तें तसं कधींच पूर्ण सुधरूं नये, असं मला वाटतं."

"कां ?"

"अपूर्णातच आनंद वाटतो मला !"

"वाः ! हल्लीं हल्लीं एखाद्या कवीसारखा बोलायला लागलास तूं !" अरुण हंसत हंसत म्हणाला.

" काय वाटेल तें म्हण तूं ! मी कांहीं तुझ्यासारखा तत्त्वज्ञानी नाहीं. मी आपला सर्वसाधारण–अगदीं व्यवहारी माणूस आहें. स्पष्ट बोलूं लागलेल्या मुलाच्या बोलण्यापेक्षां मला आपले बाळाचे बोबडे बोलच अधिक आवडतात. पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रापेक्षां चवथीची चंद्रकोरच जन्मभर पहात बसावं, असं मला वाटतं. पूर्णपणें फुललेल्या फुलापेक्षां पाकळ्या नुकत्याच मोकळ्या होत आहेत, अशा अस्फुट हंसऱ्या कळ्याच मला आवडतात."

" मला नाहीं तसं वाटत. " अरुण उद्गारला.

" हाच तर तुझ्या माझ्यांत फरक आहे ! जगाला मूर्खांत काढून तूं जगाला शिकवूं पहातोस, तर मी जग शहाणं आहे असं समजून जगाकडून शिकण्याचा प्रयत्न करतों. तूं शिक्षकाच्या भूमिकेवर आहेस, मी शिष्याच्या जागेवर आहें. आहे त्यांत समाधान मानतां येत नाहीं त्याला आणखी कितीहि मिळालं तरी समाधान वाटणार नाहीं. तुझ्यासारख्या चिंतातुर जंतूला कुठल्याहि जगांत सुख मिळणार नाहीं."

" कां नाहीं मिळणार ?" अरुणच्या ह्या प्रश्नांत, 'आपलं कुठं चुकत तर नसेल ना ?' अशी साशंक वृत्ति स्पष्ट दिसत होती. अविनाशच्या मताप्रमाणें अरुण चुकत होता. त्याचीं जगाबद्दलचीं मतें कलुषित दृष्टीमुळें बनलीं होतीं, असें अविनाशचें ठाम मत होतें. आणि अरुणची कानउघडणी करण्याची संधी कधीं मिळेल याची तो वाट पहात होता. आज ती वेळ आली, म्हणून अविनाशला झालेला अपूर्व आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसण्यासारखा होता.

" याचं कारण असं आहे अरुण," अविनाश बोलूं लागला. " स्वतःला सुखी करणं ही एक कला आहे. ती तुला अद्याप साध्य झालेली नाहीं. "

" कुठली बुवा ही अजब कला ?" जवळ जवळ थट्टा करण्याच्या इराद्यानें अरुणनें विचारलें.

" तेंच सांगतों आहें मी. माझ्याकडे पहा—एखाद्या वर्गांतल्या विद्यार्थ्या-सारखा वागतों मी. जग, समाज हा माझा वर्ग. मी त्यांतला एक विद्यार्थी! वर्ग हंसला कीं मी हसतों, वर्गाला दुःख झालं कीं मलाहि दुःख होत. समूहाशीं सहजीव होण्यांतच माणूस सुखी होतो. अरुण, म्हणूनच मला हें जग आवडतं! इतकंच नव्हे तर, याच जगांत जन्मोजन्मीं जन्माला यावं, असं मला वाटतं."

"हं—वेडा आहेस अविनाश तूं! जगाची अजून तुला पारख झालेली नाहीं."

"कां नाहीं? जगांत अनेक दोष आहेत. मला ठाऊक आहे. आणि तरीहि माझं हे मत आहे."

"अंहं! तुला नाहीं कळलं माझं म्हणणं. समाजसागरावर उघड उघड तरंगणारीं लढाऊं जहाजं तूं पाहिलीं असशील, पण त्याच समाज-सागराच्या पोटांत किती भयंकर स्वरूपाच्या पाणबुड्या बोटी संचार करतात, याची तुला अजून कल्पना नाहीं."

"हें पहा, असा मोघम बोलूं नकोस. कसल्या पाणबुड्या बोटी तुला दिसल्या?" अविनाशनें प्रश्न केला.

अरुण संतापानें लालेलाल झाला. देवळांतला चमत्कार त्याला आठवला. आणि फडक्याच्या शिवमंदिरांत नित्य नेमानें देवदर्शनास जाणाऱ्या अवि-नाशची हजेरी घेण्याच्या उद्देशानें अरुणनें शेवटीं ती गोष्ट सांगितलीच.

* * *

फडक्यांचें शिवमंदिर म्हणजे त्या गांवांतलें सर्वांत मोठें नि लोकप्रिय देऊळ! संध्याकाळच्या वेळेला बायकांनीं आणि मुलांबाळांनीं अर्धेअधिक देऊळ भरून जाई. गांवांतल्या पेन्शनर लोकांचा तर तिथें अड्डाच असा-यचा! स्त्रिया त्या देवळांत जमतात एवढें सांगितल्यावर पुरुषांच्याहि देवभक्तीला ऊत येत असे, हें निराळें सांगायलाच नको. स्त्रियांमुळेंच

देवळांत गर्दी जमते. स्त्रिया देवळांत जायच्या बंद होतील तर देवांच्या मूर्तीखेरीज चिटपांखरूंहि तिथें दिसणार नाहीं ! फडक्यांच्या शिवमंदिराच्या लोकप्रियतेचेंहि खरें इंगित तेंच होतें. शिवाय तें मंदिर चमत्काराविषयीं फार प्रसिद्ध होतें. त्या देवळात कधीं कधीं आकाशवाणीचे आवाज येतात, अशी लोकांची समजूत होती. आपण प्रत्यक्ष आवाज ऐकला आहे, असे शपथेवर सांगणारेहि भाविक कांहीं थोडे थोडके नव्हते. अविनाश हा अशा भाविकांपैकींच एक होता. तोहि जायचा रोज शिवदर्शनाला. दैवाधर्मावर त्याचा तसा फारसा विश्वास होता असें नव्हे: पण विश्वास नसतांनासुद्धां माणूस ज्या अनेक गोष्टी करतो, त्यांपैकींच अविनाशचें हें देवदर्शन होतें. नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या भविष्यांवर कुठें आपला विश्वास असतो ? पण तरीसुद्धां आपण तें शोधून वाचतोंच कीं नाहीं ? तसेंच तें देवदर्शन !

शिवमंदिरांत आकाशवाणी होते ह्या गोष्टीवर अविनाशचा विश्वास होता. मंदिरांत शिवपार्वतीचा विलास चालतो हें त्याला खरें वाटे ! पण अरुणला हे पटत नसे. अविनाशच्या दृष्टीनें अरुण नास्तिक होता. आणि अरुणच्या दृष्टीनें अविनाश अंधश्रद्धाळू होता.

अरुण मात्र नुसता अविश्वास दाखवून स्वस्थ बसला नाहीं. देवळांत खरोखरच हा चमत्कार घडतो कीं काय हें पाहाण्याचा त्यानें निश्चय केला.

शंकराचे देऊळ म्हटलें कीं, तें कुठेंतरी एका बाजूला असायचें आणि देवळाच्या गाभाऱ्यांत गुप्पाट काळोख असायचा, हें जवळ जवळ ठरल्यासारखेंच असतें ! फडक्यांचें शिवमंदिरसुद्धां कांहीं ह्या गोष्टीला अपवाद नव्हतें. देऊळ तसें मोठें होतें. पण प्रत्यक्ष शिवपिंडी असलेला गाभारा अत्यंत लहान होता. एका अंधाऱ्या घुमटींत समईच्या सौम्य प्रकाशांत फुलांनीं झांकून ठेवलेली शिवाची पिंडी लांबून स्पष्ट दिसे. घुमटीचा दरवाजा ठराविक वेळेपुरताच उघडा असे. आणि जेव्हां उघडा

राही, त्यावेळीं भिकंभट पुजारी एका फाटक्या व्याघ्रचर्मावर बसून द्वाररक्षण करी. गाभाऱ्यांत उतरायला चार पांच पायऱ्या होत्या, पण आंत जायला सर्वांनाच बंदी होती. मंदिराचें मालक खुद्द रावबहादूर फडके—तेसुद्धां आंत जात नसत, मग इतरांची काय कथा !

एके दिवशीं—

मंदिराच्या मुख्य दरवाजास टाळें मारण्याच्या पूर्वी अरुण देवळांत दबा धरून बसला. ठराविक वेळेला भिकंभटानें घुमटीचा जाळीदार दरवाजा नुसता ओढून घेतला, मुख्य दरवाजास कुलूप ठोकलें आणि नित्याप्रमाणें तो निघून गेला.

रात्रीं अकराचा सुमार झाला, तरी कांहीं कसलाच आवाज अरुणच्या कानांत पडला नाहीं. काळोख मी म्हणत होता. जिकडे तिकडे शांत नि निस्तब्ध वातावरण होतें. नुसता आंवढा घोंटला असता, तरीसुद्धां एखाद्या खोल विहिरींत भला थोरला धोंडा टाकल्यासारखा डुब्‌ असा आवाज झाला असता.

इतक्यांत—

घुमटींत कसला तरी आवाज घुमूं लागला. ध्वनि निघतो न निघतो तोंच प्रतिध्वनी निघे नि त्या शब्द-प्रतिशब्दाच्या संमिश्र आवाजानें घुमटी घुमूं लागे.

" होते बरं का आकाशवाणी !" अरुणचें मन त्याला बजावूं लागलें. पण पुन्हा कसलाच आवाज येईना. अर्थात् अरुणचे तर्ककुतर्क सुरू झाले. " आवाज आल्यासारखा आपल्याला भास तर झाला नसेल ना ?" त्याला शंका आली. तितक्यांत पुन्हा आवाज आला.

" इश्श ! केवढ्या मोठ्यानं बोलतोस ?... भिंतीलासुद्धां कान असतात बरं !..."

एवढेच चुकते चुकते शब्द अरुणच्या कानांत पडले. त्याचें मन अधिक साशंक नि उतावीळ झालें. हळुहळू कसला तरी आवाज निघे पण तो कसला होता हें स्पष्ट कळत नसे. "भिंतीलासुद्धां कान असतात," हे शब्द कुणा स्त्रीचे होते, हें भिंतीला कान लावून बसलेल्या अरुणच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं.

"देवळांत कांहीं भानगड तर चालत नसेल ना!" तो मनाला विचारूं लागला.

"छे छे! तसं कसं असेल? किती ओंगळ विचार सुचला तुला!" त्याचें मन त्याला दोष देऊं लागलें.

पण पुढें?—सगळेंच चमत्कारिक! सांगितलें तर कुणाला खरेंसुद्धां वाटणार नाहीं, असला इरसाल प्रकार! कारण कुणातरी वल्लभरमणींच्या एकांतांतल्या गुलगुल गोष्टी गाभाऱ्यांत चालल्या होत्या. प्रेमाच्या बेहोष स्थितींत जगालाच नव्हे तर स्वतःलाहि क्षणभर विसरून गेलेल्या मदनरतीच्या प्रणयचेष्टांचा तो आवाज होता. पालीच्या चुकचुकण्या-सारखा चुकचुकाट स्पष्ट ऐकूं येत होता.

स्वयंपाक घरांतून ऐकूं येणाऱ्या कपबश्यांच्या खिलखिलाटावरून आंत चहाची तयारी चालली असावी, हें जसें आपण कोणाहि ज्योतिष्याच्या मदतीवांचून ओळखतों, तसेंच घुमटींतून ऐकूं येणाऱ्या बांगड्यांच्या निनादावरून अरुणनें ताडलें कीं, गाभाऱ्यांत कुणी तरी नाजुक साळुंकी आपल्या लाडक्या चंडोलाच्या बाहुपाशांत बसून प्रणयसंगीताची सुरेल शीळ घालीत असावी!

खुदुखुदु हंसण्याच्या गोड पण अस्पष्ट नादलहरी, मधुनमधुन पुरुषी आवाजाची पण प्रेमसुलभ लाडिक बोली, क्वचित ऐकूं येणारा "अं ऽ ऽ ऊं ऽ ऽ ऽ" असा कांहींसा कण्हल्यासारखा नि कांहींसा कुंथल्यासारखा अपरिचित आवाज, नितांत सुखाच्या समाधानानें हायसें वाटून सोडलेले

सुस्कारे, इत्यादि इत्यादि वरून अरूणला सर्व कांहीं कळून चुकलें. प्रेमाच्या मानस सरोवरांत चोंचींत चोंच घालून मनमुराद पोहणाऱ्या राजहंसाच्या प्रणयी-युगुलाचें चित्तवेधक चित्र अरुणनें स्वतःच्या कल्पनासृष्टींत रंगवलें.

त्या कल्पनाचित्राकडे पाहून तोसुद्धां स्वतःला विसरून गेला. पण क्षणभरच!

पायांच्या शिरा तट्तट् वाजल्याचा आवाज त्याच्या कानांत पडला.

आंतला शिवपार्वतीचा जोडा विलास संपवून आतां बाहेर येत होता हें त्यानें ओळखलें, नि तो चोरपावलांनीं बाजूच्याच खांबाआड लपला.

"कर्ऽऽऽ!"

घुमटींतून दोन माणसें बाहेर पडतांना, दरवाज्याचीं बिचारीं बिजागरें किंचाळलीं!

दरवाजा कर्र होतांच तीं माणसें पाहून अरुणच्या काळजांत चर्र झालें! तीं दोघेंहि अरुणच्या पूर्ण माहितीचीं होतीं.

ती—ती शिवमंदिराचे मालक रावबहाद्दूर अप्पाराव फडके यांची पदवीधर एकुलती एक कन्या!

आणि तो?

तो—त्यांच्या टांग्याचा घोडा धुणारा पोऱ्या म्हादू!

शिवमंदिरांतली आकाशवाणी अरुणच्या लक्षांत आली. तीं दोघेंहि ज्या दरवाजानें बाहेर पडलीं, त्याच दरवाजानें तोहि बाहेर पडून घरीं गेला.

त्या दिवसापासून त्यानें भिकंभटाच्या कारस्थानावर पाळत ठेवली. लौकरच त्याला आढळलें कीं, फडक्यांच्या मुलीनेंच भिकंभटाची मूठ झांकली होती असें नव्हे, तर अशा अनेक तरुणतरुणींकडून चिरिमिरी

घेऊन गाभाऱ्यांतली जागा गुपचूपपणें भाड्यानें देण्याचा त्याचा पोट-धंदाच होता.

* * *

शिवमंदिरांतल्या आकाशवाणींतली ही 'अंदरकी बात' अरुणनें अविनाशला सांगितली आणि त्यानें त्याला खडसून विचारलें,—

"सांग अविनाश, हाच ना तुझा समाज ? हेंच ना तुझं जग ! याच समाजांत—याच जगांत एकजीव होण्यांत तुला आनंद वाटतो ना !"

अविनाश स्तब्ध होता. तो निरुत्तर झाला.

"अशा जगांत जगण्यापेक्षां आत्महत्त्या करावी, असं मला वाटतं. पण तेवढा धीर होत नाहीं म्हणून हें भ्याड जीणं जगावं लागतं. अविनाश, या गोष्टी—हें सत्यसुद्धां बोलायला चोरी ! सत्य सिद्ध करायला-सुद्धां तुझ्या जगांत पुराव्याचं पाठबळ हवं असतं बरं !" अरुणच्या अंगाची नुसती लाहीलाही होत होती.

अविनाशचें लक्ष कॅलेंडरवरच्या तारखेच्या कपट्यावर खिळलें होतें. तारखेच्याखालीं लॉंगफेलोचें एक वचन होतें. तें वाचून त्यानें क्षणभर विचार केला आणि त्या वचनाकडे बोट दाखवून तो अरुणला म्हणाला,

"अरुण हें बघ काय म्हणतो हा."

अरुणनें तें वचन वाचलें.

Nothing useless is or low,
Each thing in its place is best.

"अगदीं बरोबर आहे त्याचं म्हणणं." अरुण म्हणाला.

"कसं !" अविनाशनें प्रश्न केला.

"पहिल्या ओळींत तुझं मत आहे; दुसऱ्या ओळींत माझं मत आहे. अविनाश, देवळांचा उपयोग देऊळ म्हणून झाला तर त्यांत तितकसं

वावगं नाहीं. पण देवळांतून जर कुंटिणखाने चालूं लागले, तर तें तुला आवडेल का ? हाच का देवळांचा उपयोग ? अविनाश, हिंदुस्थानांतील सगळीं देवळं जमीनदोस्त करून त्यांतली मालमत्ता जर गरिबांना वांटून टाकली तर गरिबी हा शब्दसुद्धां हिंदुस्थानांत ऐकायला मिळणार नाहीं. औषधालासुद्धां गरीब उरणार नाहीं. ''

हें बोलत असतांना त्याच्या अंगांत कसला तरी संचार झाल्यासारखा भास होत होता. डोळे लालबुंद करून नि दांत ओठ चावून तो अगदीं आवेशानें बोलत होता. त्या विषयांवर त्याला कोणी बोलायला सांगितलें असतें एकाद्या सभेंत, तर मला वाटतें त्यानें कमींत कमी तीन तास तरी चांगलें लेक्चर झोडलें असतें !

देव आणि देऊळ ह्या दोन नावडत्या गोष्टी होत्या त्याच्या. बुवाबाजीनें हिंदूंचें किती नुकसान झालें आहे हें त्याला बरोबर सांगतां आलें नसतें कदाचित्; पण देवबाजी नि देऊळबाजी ह्यामुळे माणसाचें किती नुकसान झालें आहे, याची अगदीं गंमतवार माहिती तो सांगूं लागला कीं मग त्याला तहान भुकेचाहि विसर पडे.

प्रत्येक दिवशीं पै-पैसा याप्रमाणे परार्धावधी रुपये निरनिराळ्या रुपानें हिंदुस्थानांतील देवळांत जमा होत आहेत. अशा रीतीनें सार्वजनिक मालकीची मालमत्ता कोणीतरी एका मालकाच्या ताब्यांत जात असलेली पाहून त्याला देवळांत जाणाऱ्यांची मनस्वी चीड यायची.

देवळांत जमा होत असलेली व दिवसेंदिवस वाढत असलेली गडगंज संपत्ति ही सारी समाजाच्या मालकीची आहे, नि वेळीं प्रसंगीं त्या संपत्तीचा उपयोग समाजालाच झाला पाहिजे, असें त्याचें कुणालाहि न पटण्यासारखें मत होतें. नेहमींच तो देवळांना ' सार्वजनिक बँक ' अशी संज्ञा देई. आणि त्या बँकांचा उपयोग कसा करावा हें समाजाला कळत नाहीं असें समजून बहुजन समाजाला मूर्खांत काढी.

पण आतां मात्र अविनाशलाहि तसेंच वाटूं लागलें. अरुणचीं मतें अगदींच कांहीं चुकीचीं नाहींत हें त्याला थोडेंसें पटलें. तरीहि त्या विषयावर अविनाश-अरुणची बरीच प्रश्नोतरी झाली.

बराच वेळपर्यंत त्यांचा हा झगडा चालला. तो दिवस गेला. आणखी अनेक दिवस गेले. गेलेले दिवस नि दाबलेल्या वासना दडत नाहींत असें म्हणतात, तसें हें देवळांतलें प्रकरणसुद्धां कांहीं फार दिवस दडून राहिलें नाहीं.

देवळांतल्या चमत्काराचें मूळ कांहींना कळलें, कांहींना कळलें नाहीं. मात्र रा. ब. फडक्यांच्या कानांवर ती गोष्ट गेल्याशिवाय राहिली नाहीं. देऊळ बांधल्याबद्दल त्यांना पश्चाताप झाला. आणि—

एके दिवशीं न घडलेली गोष्ट घडली !

रा. ब. फडके यांनीं 'शिवमंदिर' ही पाटी काढून त्या ऐवजीं 'फडके यांची धर्मशाळा' अशी पाटी लावल्याची बातमी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली.

ह्या प्रकारामुळें धर्मभोळ्यांनीं फडक्यांना लाखोली वाहिली. पण अरुणनें त्यांना पुष्पहार वाहिला नि त्यांचें अभिनंदन केलें.

गोरगरिबांना निवाऱ्याची जागा मिळाली !

भिकंभटावर पुन्हां भीक मागण्याची पाळी आली !

देवळांतल्या चमत्कारामुळेंच हा चमत्कार घडून आला, हें मात्र अद्याप पुष्कळांना ठाऊक नाहीं.

# ब्रह्मचारी

नारायणरावांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ ! त्यांची उमर सरासरी तीस बत्तीसाच्या जवळपास होती. तरीसुद्धां लग्न न करितां आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा त्यांचा निश्चय कायम होता. खुद्द आईबापांनीं व त्याच्या इष्टमित्रांनीं लग्नासाठीं केलेली रदबदली नेहमींच निष्फळ ठरत असे. आतां तर त्याला लग्नासंबंधीं कोणी कांहींच सांगत नसे. कारण तसं सांगितल्यावर नारायणराव त्याला वाटाण्याच्या अक्षता लावायला चुकणार नाहीं, अशी प्रत्येकाची बालंबाल खात्री होऊन चुकली होती.

नारायणरावासारखा तरणाबांड ब्रह्मचारी राहणार, याबद्दल गांवांतील लहानथोराला मोठं कौतुक वाटे. इतकेंच नव्हे तर ह्या त्याच्या खडतर व्रताचरणाबद्दल प्रत्येकाला त्याच्याविषयीं आदर व अभिमान वाटे.

त्यानें आपल्या गोड स्वभावाची मोहिनी पसरून साध्यासुध्या लोकांना अगदीं आपल्या कह्यांत ठेवलें होतें. नारायणराव म्हणजे त्यांचा डोळा होऊन बसला होता. नारायणरावानें कांहीं करावें, त्यांना आपलें सर्व प्रमाण ! कारण चोख वर्तनाचा, कडक शिस्तीचा आणि खुल्या दिलाचा नारायणराव चुकूनसुद्धां वाईट कृत्य कधीं करायचा नाहीं, अशी त्या लोकांची पूर्ण खात्रीच होती. नारायणराव ब्रह्मचारी म्हणजे अगदीं सोवळी मूर्ति, असाच सर्व माणसांचा समज होता. कारण त्याच्या वर्तनाविषयीं संशय घ्यायला मुळींच जागा नव्हती.

नारायणराव हा पवित्र आचरणाचा व खराखुरा ब्रह्मचारी आहे, अशी गांवांतल्या गांवकऱ्यांची खात्री झाली होती !

आणि जग हें खरोखरच गाजरपारखी आहे, याची खात्री नारायणरावाची झाली होती.

नारायणराव जन्मतःच हाडापेरानें 'मजबूत' असल्यानें, व त्यांत त्याच्या नियमित व्यायामामुळें त्याचें शरीर एखाद्या मल्लासारखें पिळदार व बांधेसूद दिसत असे.

आपल्यावरच्या लोकांच्या विश्वासाचा फायदा घेऊन त्यानें थोडासा फंड गोळा केला आणि गावांतल्या मुलांमुलींच्या कल्याणासाठीं म्हणून एक लहानशी व्यायामशाळा बांधली. नारायणरावांच्या ह्या पवित्र व लोककल्याणकारक कार्यामुळें लोकांच्या मनावर नारायणरावांच्या उदारपणाबद्दल जास्तच ठसा उमटला !

ती व्यायामशाळा नारायणरावांच्या खिशांतील एक पैहि खर्च झाल्याशिवाय लोकांनींच बांधलेली होती. गांवांतल्या लोकांनीं आपल्या मुलांमुलींनाहि त्या व्यायामशाळेंत पाठविण्यास सुरवात केली.

नारायणरावांच्या व्यायामशाळेचा कोण तो थाट ! जिकडे तिकडे गभीर वातावरण ! हनुमान–जयंतीच्या दिवशी तर अगदीं दांडगा उत्सव असायचा त्या शाळेंत ! कारण मास्तर पडले ब्रह्मचारी ! त्या दिवशीं जिकडे तिकडे फुलांच्या माळा, तोरणें, रांगोळ्या, चौघडा, सर्वत्र सुंदर सजावट दिसायची ! आणि नारायणराव आपल्या खोलींत ध्यानस्त असायचे त्या दिवशीं ! एखाद्या विद्यार्थिनीलाच त्या दिवशीं आंत जायला परवानगी असायची. बाकीच्यांना त्या खोलींत जायची बंदी !

नारायणरावांची व्यायामशाळा अत्यंत भरभराटीसहि आली. लहानथोर स्त्रीपुरुष त्या शाळेंत आपणांस फावेल त्यावेळीं व्यायाम शिकत असत.

नारायणराव हे ब्रह्मचारी असल्यामुळें त्यांच्या शाळेंत तरुण मुलींना पाठवायला कोणालाच कांहीं वावगें वाटलें नाहीं.

खुद्द नारायणरावांच्या खास मर्जीतल्याहि कांहीं मुली होत्या. त्या अधूनमधून नारायणरावांच्या खाजगी खोलींतून चोरपावलांनीं बाहेर जात येत असतांना कित्येकांनीं पाहिल्या होत्या. पण नारायणराव पडले ब्रह्मचारी ! त्यांच्या धुवट वर्तनाबद्दल संशय घेणें म्हणजे जवळ जवळ पापच तें !

'असा असा प्रकार आम्हीं पाहिला,' एवढेंहि दुसऱ्या कोणास सांगायला त्यांचें मन तयार होईना. कारण ते जाणून होते कीं, आपल्या सांगण्यावर कोणाचाच विश्वास बसायचा नाहीं, आणि उलट आपली मात्र फजिती व्हायची !

बरेचे दिवस गेले. नारायणरावांच्या ब्रह्मचर्याबद्दलची कोणाचीच खात्री कमी झाली नव्हती. इतक्यांत एका वर्तमानपत्रांतून खालील मजकूर प्रसिद्ध झालाः—

**ब्रह्मचाऱ्यावर वेश्येची फिर्याद !**

"...येथील एका वेश्येनें नारायणराव ब्रह्मचारी यांच्यावर विश्वासघाताची फिर्याद केली असून, त्यांत तिनें, आपण नारायणरावांची बऱ्याच वर्षांची रखेली आहे, असें म्हटलें आहे."

असा मजकूर प्रसिद्ध झालेला वाचून प्रत्येकाचें बोट तोंडात गेलें. गळ्याभोंवती गुंडाळलेला गळपट्टा गळा कापणारा पट्टा ठरल्याबद्दल प्रत्येकाला आश्चर्य वाटूं लागलें. तेव्हांपासून तो एकच विषय त्या गांवांतील लोकांच्या चर्चेचा होऊन बसला होता.

ही बातमी प्रसिद्ध झाल्यापासून नारायणरावांची शाळा बंद ! नारायणरावांनीं पुनः तोंडच दाखविलें नाहीं. जो तो त्यांचा शोध करूं लागला. निदान ही गोष्ट खरी कीं खोटी इतकातरी त्यांच्याकडून खुलासा करून

घ्यावा, असें प्रत्येकाला वाटत असल्यामुळें नारायणरावासाठीं सर्वजण शोध करूं लागले.

*  *  *

ह्या गोष्टीची चर्चा चालू असतांनाच दुसरा एक धक्का देणारा प्रकार घडला.—

चावडीवर चिकार गर्दी जमली होती. पाटील व दोनचार शिपाई एका वृद्ध बाईची फिर्याद ऐकून घेत होते. ती वृद्ध स्त्री एकसारखी आक्रोश करीत होती. मधून मधून डोकंहि जमिनीवर आपटीत असे.

'माझी—म्हातारीची एकुलती एक पोर मेल्यानं पळवली हो! पाटीलसाहेब, माझी तारा मला मिळवून द्या हो! तो मेला नाऱ्या तिला कुठं घेऊन गेला त्याचा शोध करा, आणि माझी आंधळीची काठी मला परत द्या हो पाटीलसाहेब!'

म्हातारीचे हे करुणोद्गार ऐकून प्रत्यक्ष पाटीलबुवांच्या डोळ्यांतहि अश्रू उभे राहिले. मग इतरांच्या डोळ्यांत पाणी आल्यास नवल कसलें!

तिची एकुलती एक मुलगी तारा—त्याच ब्रह्मचाऱ्यानें पळविली होती, हें सर्वांच्या ध्यानीं येऊन चुकलें. नारायणराव नापत्ता कां झाला याचा प्रत्येकास उलगडा झाला, आणि ब्रह्मचाऱ्याच्या खाजगी खोलीचेंहि कोडें सुटलें.

ब्रह्मचाऱ्याचा भ्रमाचा भोपळा फुटला. आपण अगदीं आंधळ्या विश्वासानें एका नीच, भामट्या मनुष्याच्या ताब्यांत आपल्या तरुण पोरीबाळी दिल्या, याबद्दल प्रयेक आईबापास पश्चात्ताप झाला!

ब्रह्मचाऱ्याच्या तावडींत सांपडून भ्रष्ट झालेल्या कुमारिकांनीं तिथल्या तिथें कोणा नकळत जिभा चावल्या! त्यांच्या अंगावर तारेचा प्रकार ऐकून कांटा उभा राहिला!

‘ नारायणरावांचं हें असं होतं तर !’ असे अस्पष्ट उद्गार प्रत्येक मुलीनें स्वतःशीं काढले !

पाटीलबुवांनीं, त्या म्हातारीस तिची मुलगी परत मिळवून देण्याचें आश्वासन देऊन तिला तिच्या घरीं पाठवून दिली ! इतर लोकहि तिची नाना तऱ्हेनें समजूत घालूं लागले. पण तिचं आईचं आंतडं तें ! ती एखाद्या पिसाळलेल्या वाघिणीसारखी चवताळली होती !

‘ मेल्यानों, माझी आतां समजूत घालायला येतां ! तुम्हांस शरम कशी नाहीं वाटत ? एका सापाला दूध पाजून पुष्ट केलांत ! तुम्हींच ना त्याला ब्रह्मचारी समजून थोर मानीत गेलांत ? आणि मी कोण चांडाळ तरी—! कसं मी तुमच्या पावलांवर पाऊल टाकलं—आणि शेवटीं पश्चात्तापांत पडलें ! !

थोरामोठ्यांच्या मुलीबाळी त्या शाळेंत जातात म्हणून मीहि माझ्या तारेला पाठविली. आणि—अशा म्हातारपणांत एकुलत्या एक पोरीला मुकावं लागलं ! मेल्यानों, कोणी माझी समजूत करूं नका ! करा काळं माझ्या पुढून ! !’

म्हातारी ओक्साबोक्सी रडत आणि काकुळतीला येऊन बोलत होती. ऐकणारांच्या काळजाचं पाणीपाणी होत होतं.

दोन चार दिवसांनंतर—

शिपायांच्या प्रयत्नास यश आलं ! तारेला घेऊन पळून जात असतां-नाच वाटेंतील एका धर्मशाळेंत नारायणराव ‘ ब्रह्मचारी ’ तारेसह पकडले गेले.

शिपायांनीं नारायणरावास पाटीलबुवांच्या समोर उभा केला.

तारा अज्ञान ठरल्यामुळें तिला तिच्या आईच्या स्वाधीन करण्यांत आलें.

तारेनेंहि आपली हृदयद्रावक कहाणी कचेरींत सांगितली. दोनचार आरोपाखालीं नारायणरावावर खटला भरण्यांत येऊन, वेश्या प्रकरणांत व

तारा प्रकरणांत मिळून त्याला बऱ्याच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा फर्माविण्यांत आली.

ब्रह्मचर्याचा बेंडबाजा वाजला !

ब्रह्मचर्याच्या पवित्र व्रताचें विडंबन-विटंबना केल्याबद्दल पापाचा वाटा परमेश्वरानें त्याच्या पदरांत टाकला.

तेव्हांपासून, 'खात्रीचा माणूस असल्याशिवाय आपल्या मुली व्यायामशाळेंत पाठवावयाच्या नाहींत,' असें म्हणून गांवच्या पालकांनीं कानास खडा लावून घेतला !

आणि 'ब्रह्मचारी' हा शब्द एका विशिष्ट अर्थानें त्या गांवांत रूढ झाला ! गुप्तरीतीनें रखेल्या राखून व दुसऱ्याच्या तरुण मुलींना फसवून ब्रह्मचारी असल्याचा टेंभा मिरविणारे सारेच लफंगे ब्रह्मचर्याचें पावित्र्य विडंबनच करीत नाहींत काय ?

# बहिणीची माया

बायकांचं मन हें झुलत्या पुलासारखं आहे. पुरुषजात अनंत वर्षे तो पूल तुडवीत पुढं चालली आहे. प्रत्येक पावलाच्या आघातानें तो पूल लपलप हालत असला तरी अद्याप ढांसळलेला नाहीं किंवा ढांसळणारहि नाहीं.

अशाच् लवचिक पण खंबीर मनाच्या स्त्रीजातीचा आदर्श म्हणून बकुलेकडे कोणीहि अभिमानानं बोट दाखवावं, असंच तिचं वर्तन असे. परंतु तिच्या आचरविचारांत एक प्रकारचं औदासिन्य असायचं. चेहे-ऱ्यावर किंचित् निराशेची पुसटशी छटा दिसायची आणि बोलणं एखाद्या विरक्त विभूतीसारखं वाटायचं.

तिच्या प्रत्येक शब्दांत अनेक वर्षांच्या अनुभवांचं अर्क ओतप्रोत भरलेलं असल्यामुळं, शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिच्याविषयीं अत्यंत आदरभाव वाटे. तिच्या कधीं उदास तर कधीं आनंदी वृत्तीमुळं लोकांना एक प्रकारचं कोडंच पडे. कांहींजणांना वाटे कीं, तिच्या वयस्कतेचा तो स्वाभाविक परिणाम असावा! पण खरी वस्तुस्थिति थोडी निराळीच होती, हें अंबूताईला एके दिवशीं अचानकपणें कळून आलं.

रोजच्याप्रमाणें बकुला आपल्या घरकामांत गुंतलेली होती. सकाळचे सुमारें ९ वाजले असतील, तोंच 'बकुलाताई, अहो बकुलाताई–' अशा हांका मारीत शेजारच्या अंबूताई मारे घाईघाईनंच बकुलेला शोधीत

आल्या. ' अहो वाचलंत का हें ? तुमच्या भावानं तुमच्या थोरल्या बहिणीच्या नांवानं केवढी मोठी देणगी दिली ती !' वर्तमानपत्र पुढं करीत अंबूताई म्हणाली. बकुला बुचकळ्यांतच पडली. भावानें देणगी दिली हें ऐकून तिला आश्चर्यच वाटलं प्रथम. म्हणून अंबूताईच्या हातांतलं वर्तमानपत्र घेऊन तिनें ती बातमी वाचली—

**' विधवा वनिता आश्रमास दहा हजार रु. ची उदार देणगी '**

' दानशूर नागेशराव......यांनीं आपल्या दिवंगत बहिणीच्या पुण्यतिथीच्या दिवशीं वि. व. आ. ला दहा हजार रुपयांची उदार देणगी दिली...' वगैरे वगैरे.

' पाहिलंत ?—याला म्हणतात भाऊ ! किती हो बहिणीवर प्रेम असेल तुमच्या भावाचं !' अंबूताई उद्गारली. बकुला जास्त कमी कांहींच बोलली नाहीं. एक दीर्घ निःश्वास सोडून फक्त एवढंच म्हणाली—' अंबूताई, हें बहिणीचं प्रेम नव्हे–बहिणीची माया !'

आपल्या भावाचं औदार्य पाहून बकुलेला आनंद होईल अशीच तोंपर्यंत अंबूताईची समजूत होती. पण झालं उलटच ! ती बातमी वाचून बकुला गोरीमोरीच झाली. ' बहिणीची माया ' असं म्हणतांना ' माया ' शब्दावर जोर देत, उजव्या हाताचा आंगठा तर्जनीवर घासून तिनें जी पैशांची खूण दाखवली, त्यावरून कांहींतरी पैशांची भानगड असावी, हें अंबूताईच्या लक्षांत आल्यावांचून राहिलं नाहीं.

' बहिणीची माया ? म्हणजे हो काय बकुलाताई ?' थोडीशी माहिती काढून घेण्याच्या इराद्यानेंच अंबूताईनें प्रश्न केला.

घरगुती गोष्टी कोणी कोणाला सांगूं नयेत हें खरं, पण जात्यावर बसलं कीं ओवी आठवल्याशिवाय राहात नाहीं. अगदीं तसंच झालं बकुलेचं. अंतःकरणांतला कढ बाहेर पडल्याशिवाय राहिला नाहीं.

‘ माझा भाऊ दानशूर झाला ! मोठा कर्णाचा अवतार बनला ! ! पण हें औदार्य कुणाच्या जिवावर ? ठाऊक आहे अंबूताई तुम्हांला ? ’ असं म्हणून शेवटीं तिनें सगळी हकीकत अंबूताईला सांगितली.

* * *

विमला, बकुला आणि नागेश हीं तीन भावंडं. विमलेचं अगदीं लहानपणींच लग्न झालं होतं; आणि तिला स्थळहि चागलं श्रीमंत मिळालं होतं. पण लग्नानंतर अवध्या दोनच वर्षांनीं तिला वैधव्य आलं. तिच्या जावांचं नि तिचं पटेना म्हणून सामोपचारानं तिच्या दीरांनीं तिला एकत्रित इस्टेटीपैकीं वीस हजार रुपये दिले नि तिला वेगळी केली. तेव्हांपासून ती माहेरींच रहात असे. वीस हजार रुपयांची रक्कम तिनें आपल्या, बकुलेच्या व नागेशाच्या नांवानें तिघांपैकीं कुणालाही काढतां यावी या'अटीवर एका बँकेंत ठेव म्हणून ठेवली. बकुलेचं लग्नकार्य, शिक्षण वगैरे सगळं कांहीं आपणचं करावं अशी तिला हौस होती असं म्हटलं तरी चालेल. पण नागेश मात्र अगदीं आयतोबा ! पण पुरुषांच्या मदतीशिवाय कोणतीच गोष्ट न करण्याची बायकांना जी एक संवय जडलेली असते, त्या संवयीचा परिणाम म्हणून ‘ पैशाचा व्यवहार आहे हा, पुरुष असला म्हणजे बरं ’ असा विचार करून, विमलेनं नागेशचंहि नांव त्या व्यवहारांत उगीच गुंतवलं होतं.

बरींच वर्षे गेलीं. विमला आणि बकुला यांचं मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालं नि एकीनें शाळेंत मास्तरणीची आणि दुसरीनें स्त्रियांच्या एका संस्थेंत पगारी चिटणिसाची नोकरी केली. दोघीहि पगार आणायच्या, पोटगीचे पैसे भावाला द्यायच्या, आपला कपडालत्ता आपणच करायच्या नि शिल्लक बँकेंत टाकायच्या. वीस हजारांना त्यांनीं कधीं हातहि लावला नाहीं. व्याजासह ती रक्कम तर वाढतच होती. पण आणखी तींत भर पडत होती.

पण पुढं विमला एकाएकीं वारली. बकुलेचं मायेचं माणूस गेलं. तिला हळुहळू एकलेपणाची जाणीव होऊं लागली. आणि तिशी उलटली तरी अद्याप अविवाहित असलेल्या बकुलेला लग्न करावं असं वाटूं लागलं. आपल्या कांहीं मैत्रिणींच्या मदतीनें तिनें वरहि पसंत केला.

एके दिवशीं तिनें आपला बेत भावाला सांगितला. भावाच्या अंगाचा तिळपापड झाला नुसता. नवऱ्या मुलासंबंधानें हजारों खोट्यानाट्या गोष्टी सांगून तिला लग्नापासून परावृत्त करावयाचा त्यानें कसोसीनें प्रयत्न चालविला. बिचारी बकुला पेंचांत सांपडली. तिचं एक मन तिला भेड-सावूं लागलं कीं, ' दादा म्हणतो तेंच खरं असलं नि नवरा खरोखरच व्यसनी निघाला आणि असेल नसेल तें बळकावून बसला तर ? माझे हाल होणार नाहींत कशावरून ! माझ्या पैशासाठीच तो माझ्याशीं लग्न करायला तयार झाला नसेल ना ! ' पण लगेच दुसरं मन तिला बजावून सांगे कीं, ' वेडी आहेस तूं ! लग्नाचं कारण पैसा नसून प्रेम आहे. अशा निःस्वार्थी माणसाच्या प्रवित्र प्रेमाबद्दल असा संशय घेणं, म्हणजे पाप आहे.'

नाहीं होय करतां करतां घरांत रोज रणं माजूं लागलीं. भावानें बहिणीशीं अबोला धरला. पण बकुलेनें आपला निश्चय सोडला नाहीं. भावाच्या मनाला नि विरोधाला न जुमानतां तिनं लग्न केलं. नागेश हातपाय आपटीत स्वस्थ बसला.

एकदोन वर्षे गेलीं. तितक्यांत ठेवीची मुदत संपल्याची बकुलेला आठवण झाली, म्हणून ती आपल्याला कळवल्याशिवाय एकट्या नागे-शला पैसे काढायला देऊं नका, असें बँकेला सांगण्यासाठीं ती बँकेंत गेली. तों काय ? आधल्याच दिवशीं नागेशनें सगळी रक्कम काढून नेली, असं तिला कळलं.

तिचं डोकं अगदीं सुन्न झालं. काय करावं तेंच तिला समजेना.

निराश होऊन तशीच ती परत आली. भावावर कायदेशीर इलाज करावा असं अनेक जणांनीं तिला सुचविलं. पण नवऱ्यानें तिला कोर्टाची पायरी चढूं दिली नाहीं. नवऱ्यानें त्यावेळीं तिचं सांत्वन करून तिला धीर दिला नसता, तर तिनें वाघीण बनून भावाचे लचके काढायला कधींच कमी केलं नसतं.

तेव्हांपासून बहीण भावाचं नातं तुटलं. पण बकुलेनं ही गोष्ट स्वतः होऊन कोणाला सांगितली नव्हती. 'लग्न करूं नको' असं आग्रहानं सांगण्यांत भावाचा काय मतलब होता हें बकुलेला कळून चुकलं होतं. बहिणीनें भावावर विश्वास ठेवला, पण त्यानें तिचा विश्वासघात केला.

पैशावर विश्वास ठेवूं नये; विश्वासाच्या ठिकाणीं पैसा ठेवावा ! बकुलेला हें माहीत होतं. पण पैसा हा एक अथांग समुद्र असून त्यांत सत्य, सदसद्विवेकबुद्धि आणि विश्वास यांचीं प्रेतं अखंड तरंगत आहेत, हें तिला अद्याप ठाऊक नव्हतं.

थोड्याशा पैशामुळं बहिणीचा विश्वासघात करणारा भाऊ आणि प्रेमापुढं पैशाला कवडीची किंमत न देणारा नवरा—दोघेहि पुरुषच ! एकामुळं उद्विग्न झालेलं तिचं मन दुसऱ्यानं प्रसन्न केलं. वाईटाप्रमाणंच बरे पुरुष जर जगांत नसते तर स्त्रियांचं जीवन दुःसह झालं असतं, असं बकुला नेहमींच म्हणे, त्याचं कारणहि हेंच.

सारी हकीकत ऐकून अंबुताईला अत्यंत वाईट वाटलं. 'ऐकलंस अंबुताई, असं आहे हें. आपण बहिणीचा पैसा बळकावला म्हणून त्याचं मन त्याला खाऊं लागलं असेल. थोडासा दानधर्म केला म्हणजे पापाचा पैसा पचतो असं कांहीं जणांना वाटतं. त्यापैकींच आमचा दादा !'

इतकं झालं तरी बकुलेच्या तोंडून एकसुद्धां अशुभ शब्द निघाला नाहीं. तिच्या ठिकाणीं दुसरी कोणी असती, तर तिनें रागाच्या भरांत भावाला

लाखोली वाहिली असती, आणि बोटं मोडीत हजारों शिव्याशाप दिले असते ! पण उलट ' असो बिचारा ! दादा आज दानशूर झाला, उद्यां धर्मवीर होईल. आणि कुणी सांगावं—पैशांच्या जोरावर तो महात्माहि होऊन बसेल ! होवो—तो खुपखूप मोठा होवो ! माझा भाऊ महात्मा झाला, असं तरी मी अभिमानानं म्हणेन. ' असे उद्गार काढलेले ऐकून अंबुताईला तिच्या मनाच्या मोठेपणाची खात्री पटली. शेवटीं अंबूताई बकुलेला एवढंच म्हणाली कीं—' सारांश हाच कीं, प्रत्येक प्रकारचं प्रेम थोड्याफार प्रमाणांत आंधळं असतं. पण पैशाच्या प्रेमाला डोळेच नसतात मुळीं !'

## संग्राह्य ग्रंथ

**प्रो. ना. सी. फडके**

जीवन संगीत
वादळ
प्रतिज्ञा
अखेरचं बंड
बस नंबर बारा
प्रवासी
समरभूमि
आशा
कलंकशोभा
अबोलीच्या गोष्टी
उन्माद
गुप्त प्रायश्चित्त
वेंचलेले मोती
मनोहरची आकाशवाणी
गुजगोष्टी
नव्या गुजगोष्टी
धूम्रवलयें
आजचे तरुण स्त्री-पुरुष व त्यांजपुढील प्रश्न
काळे गोरे
आधुनिक गीता

**प्रो. अनंत काणेकर**

चांदरात

**प्रो. भा. ल. पाटणकर**

बालकवींची समग्र कविता

**कॅ. मा. कृ. शिंदे**

अर्थाचा अनर्थ [ नाटिका ]
४२ चें आंदोलन [संगीत नाटक]
गुंतागुंत [ नाटक ]
गुलाबी गप्पा [ हास्यकथा ]
गुलगुल गाणीं

**श्री. भा. वि. वरेरकर**

षोडशी
उघडझांप
सदा बंदिवान
जागती ज्योत

**सौ. कुमुदिनी रांगणेकर**

स्त्रियांच्या कुबड्या [ स्त्रियांसाठी नाटिका ]

**श्री. विश्राम बेडेकर**

रणांगण

**श्री. अ. ह. जोशी**

अनंतकाळचे प्रवासी
रेडियोसाठीं कसें लिहावें ?

**श्री. दत्तु बांदेकर**

प्रेमपत्रें

**श्री. कोठीवाले**

ग्रामोद्धार

**श्री. आठवले**

म्हातारपणचे डोहाळे

**रामकृष्ण बुक डेपो, मुंबई ४**